दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३०६ बुधवार दि.१५ जुलै २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-306 Wednesday, Dt.15 July 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## थोडक्यात बातम्या...!

### 1 दापचरीत उभारणार आंतरराष्ट्रीय कृषी बाजार

मुंबई । प्रतिनिधी
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पालघर जिल्ह्यातील दापचरी येथे फ्रान्समधील रुंगिस बाजाराच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय कृषी बाजार उभारण्यास मंजुरी देण्यात आली. यासाठी दापचरी दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला विनामूल्य देण्यात येणार आहे.

### 2 शेतकऱ्यांना कर्जमाफीचा मोठा दिलासा

मुंबई । प्रतिनिधी
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाळी अधिवेशनात केलेल्या घोषणेनुसार 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' निकषात सुधारणा करण्यात आली. ५० हजार रुपयांची मर्यादा हटविण्यात आल्याने सुमारे १३ लाख शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळणार आहे.

### 3 महापालिका मालमत्तांमधून वाढणार उत्पन्न

मुंबई । प्रतिनिधी
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बैठकीत महापालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी मालमत्ता मुद्रीकरण (-ीशीं चेपशींळीरींळेप) धोरणाला मंजुरी देण्यात आली. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना शाश्वत उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध होणार आहेत.

### 4 'अर्बन चॅलेंज फंड' राबविण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केंद्र पुरस्कृत अर्बन चॅलेंज फंड अभियान राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली. शहरांच्या पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांना यामुळे चालना मिळणार आहे.

### 5 बीड क्रीडा संकुलासाठी २४.९५ कोटींचा निधी

मुंबई । प्रतिनिधी
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बैठकीत बीड जिल्हा क्रीडा संकुलासाठी २४.९५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली. अत्याधुनिक क्रीडा सुविधा उभारून होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन दिले जाणार आहे.

### 6 मुक्तबंदींच्या पुनर्वसनासाठी सरकारचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अपराधी परिविक्षा अधिनियमांतर्गत मुक्तबंदी व परिविक्षाधीनांना देण्यात येणारे पुनर्वसन अनुदान २५ हजारांवरून ५० हजार रुपये करण्यास मंजुरी देण्यात आली.

### 7 एसटीच्या जागांच्या विकासाला गती

मुंबई । प्रतिनिधी
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अतिरिक्त जागांच्या विकासासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (झझझ) धोरणातून सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

# ताई, आता बीडकडे वळा..! विकासासाठी वेळ द्या..!!

## कार्यकर्त्यांचा विश्वास पुन्हा जिंका...!!!

**बीड । वैभव स्वामी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे या १५ जुलैपासून बीड जिल्ह्याच्या अधिकृत दौऱ्यावर येत असून, मंत्री झाल्यानंतर प्रथमच त्या जिल्ह्यात विविध विकासकामांचा आढावा, शासकीय बैठका, उद्घाटने आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा आढावा हा या दौऱ्याचा प्रमुख भाग असणार आहे.

पंकजाताई मुंडे यांच्याकडे जालना जिल्ह्याचे पालकमंत्रीपद आहे. त्यामुळे मंत्री झाल्यापासून



बीड जिल्ह्याकडे त्यांचे अपेक्षित लक्ष राहिले नसल्याची भावना कार्यकर्ते आणि सर्वसामान्यांमध्ये सातत्याने व्यक्त होत आहे. गेल्या दोन वर्षांत बीड जिल्हा विविध कारणांनी चर्चेत राहिला. कायदा-सुव्यवस्था, सामाजिक तणाव, विकासकामांचा मंदावलेला वेग आणि प्रशासनावर लोकप्रतिनिधींचा कमी झालेला प्रभाव. यामुळे जिल्ह्याची प्रतिमा धुळीस मिळाल्याची खंत अनेकजण व्यक्त करत आहेत.अशा पार्श्वभूमीवर पंकजाताईंचा हा दौरा केवळ शासकीय कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता जिल्ह्याला नवसंजीवनी देणारा ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. भाजपची सत्ता केंद्रात आणि राज्यात असताना बीड जिल्ह्यात मात्र विकासाच्या प्रश्नांवर संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे ताईंनी आता जिल्ह्याला अधिक वेळ देत विकासकामांना गती द्यावी, कार्यकर्त्यांशी थेट संवाद वाढवावा आणि जनतेच्या अपेक्षांना न्याय द्यावा, अशी भावना व्यक्त होत आहे.पंकजाताईंचा हा दौरा बीडच्या विकासाला नवी दिशा देतो की केवळ औपचारिकता ठरतो, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### तर पुन्हा एकदा गमावलेला विश्वास अधिक दृढ होऊ शकतो..?

ताई मागच सर्व विसरून यापुढच्या येणाऱ्या काळात विकासकामांना गती, प्रशासनावर प्रभावी समन्वय आणि चिडचिड न करता कार्यकर्त्यांशी आत्मीय संवाद साधण्यात यश मिळवले तर पुन्हा एकदा पंकजाताईंच्या नेतृत्वावरील विश्वास जनतेमध्ये अधिक दृढ होऊ शकतो. त्यासाठी जिल्ह्याच्या प्रश्नांवर अधिक वेळ देणे, जनतेची कामे प्राधान्याने मार्गी लावणे आणि कार्यकर्त्यांशी संयमाने संवाद ठेवणे, हीच काळाची गरज असल्याचे मत राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

# ना. पंकजाताई मुंडे आज गेवराई शहरात

**नगरपरिषदेच्या विकास कामांचा होणार शुभारंभ , नागरिकांनी उपस्थित रहावे – नगराध्यक्षा गीताभाभी पवार**

**गेवराई प्रतिनिधी**

गेवराई नगर परिषदेच्या विविध विकास कामांचा शुभारंभ बुधवार ता. १५ रोजी सकाळी १० वाजता, महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण संवर्धन मंत्री, ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन गेवराई नगर परिषदेच्या नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार यांनी केले आहे.



बुधवार ता. १५ रोजी सकाळी दहा वाजता नगरपरिषद कार्यालयाच्या सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमास ना. पंकजाताई गोपिनाथराव मुंडे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, भाजपा नेते तथा माजी मंत्री बदामराव पंडित, भाजपाचे नेते बाळराजे पवार, नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार, नपचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, नपच्या उपाध्यक्ष रेवती भगवान घुबार्डे, नप, सभापती, नगरसेवकांची उपस्थिती राहणार आहे. ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असलेल्या या कार्यक्रमास गेवराई शहरातील नागरिकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन गेवराई नगर परिषदेच्या नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार यांनी केले आहे.

# बीडच्या महामार्गालगत ११० उघड्या विहिरी; प्रवाशांच्या जीवाला मोठा धोका..?

## तांदुळवाडी दुर्घटनेनंतर महामार्ग पोलिसांचे सर्वेक्षण, डॉ. गणेश ढवळे यांच्या मागणीला प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील तांदुळवाडी येथील भीषण दुर्घटनेनंतर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदन देऊन महामार्गालगतच्या उघड्या विहिरींचे सर्वेक्षण व सुरक्षा उपाययोजनांची मागणी केली होती. त्यानंतर गढी व मांजरसुंबा महामार्ग पोलिसांनी केलेल्या पाहणीत बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गालगत तब्बल ११० उघड्या व धोकादायक विहिरी असल्याचे समोर आले आहे.

सर्वेक्षणात मांजरसुंबा महामार्ग पोलीस चौकीच्या हद्दीत ४६, तर



गढी महामार्ग पोलीस चौकीच्या हद्दीत ६४ विहिरी धोकादायक अवस्थेत असल्याची नोंद झाली आहे. अनेक विहिरींना संरक्षक कठडे व लोखंडी जाळ्या नसल्याचे आढळून आल्याने संबंधित शेतकरी व संस्थांना तातडीने संरक्षण व्यवस्था उभारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मांजरसुंबा महामार्ग विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी ढगारे यांनी सर्वेक्षणाचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी पोलीस अधीक्षकांकडे पाठविल्याची माहिती दिली. तर गढी महामार्ग विभागाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक माधुरी मुंडे यांच्या पथकानेही सर्वेक्षणात सहभाग घेतला.डॉ. गणेश ढवळे यांनी केवळ नोटिसा देऊन प्रश्न सुटणार नसून सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राज्य महामार्ग प्राधिकरण, महामार्ग पोलीस, उपप्रादेशिक परिवहन विभाग आणि संबंधित शेतकरी यांनी संयुक्त मोहीम राबवून प्रत्येक विहिरीभोवती मजबूत संरक्षक कठडे व लोखंडी जाळ्या बसवाव्यात, अशी मागणी केली आहे.

# गेवराई पोलिसांची चोरट्या वाळू उत्खनन व वाहतुकीवर धडक कारवाई



**गेवराई । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याच्या निर्देशानुसार गेवराई पोलिसांनी अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरुद्ध धडक मोहीम राबवत अवघ्या २४ तासांत दोन स्वतंत्र कारवाया करून २७ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पहिल्या कारवाईत दि. १३ जुलै २०२६ रोजी पहाटे सुमारे ३.१० वाजता गेवराई बायपास रोडवरील दत्तराज पार्क परिसरात गस्ती दरम्यान एमएच-१२-

पान २ वर...

# दादांचा शब्द... ताईंची पूर्तता, बीडच्या क्रीडा स्वप्नांना २४.९५ कोटींचे बळ




**बीड । वेदांत स्वामी**

बीड जिल्ह्यातील खेळाडूंना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या जिल्हा क्रीडा संकुलाच्या उभारणीस अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य मंत्रिमंडळाने २४.९५ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाला मंजुरी देत निधीला हिरवा कंदील दिला आहे.

पान २ वर...

### पालकमंत्र्यांचे यांनी मानले विशेष आभार..!

मंत्रिमंडळाच्या या निर्णयानंतर आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक, सभापती शेख निजाम आदींनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांचे विशेष आभार मानले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777



दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


संपादकीय....

# विकास, की विकासाचा ऱ्हास?

'प्रजा' संस्थेच्या २०२६ च्या अहवालातून मुंबईतील कचरा, प्रदूषण, वाहतूक आणि इतर नागरी समस्यांचे गंभीर चित्र समोर आले आहे. शहराचा विकास खऱ्या अर्थाने साधायचा असेल, तर या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे अहवालातून स्पष्ट होते.

पावसाने उघडीप देताच मुंबईकरांनी सुटकेचा निश्वास टाकला असला तरी शहरासमोर उभ्या असलेल्या नागरी समस्यांचे ढग काही हटलेले नाहीत. रस्त्यांवर पाणी तुंबणे, रेल्वे आणि रस्ते वाहतूक विस्कळीत होणे, कार्यालयात पोहोचण्यास होणारा विलंब, सखल भागांत पाणी साचणे, हवामानातील बदल आणि मनुष्यबळाची कमतरता यांसारख्या प्रश्नांनी आर्थिक राजधानीची घुसमट सुरूच आहे. यंदाच्या पावसाने तर या समस्यांना अधिक गंभीर रूप दिले. मॅनहोलमध्ये नागरिकपडण्याच्या घटना, शाळेच्या बसवर झाड कोसळून विद्यार्थ्याचा मृत्यू, महापौरांच्या उपस्थितीतच मॅनहोलमध्ये व्यक्ती पडल्याची घटना आणि मोठ्या प्रमाणावर झाडे उन्मळून पडणे या घटनांनी पालिकेच्या तयारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

या घटनांनंतर विरोधकांनी पालिकेवर टीकेची झोड उठवलीच; पण सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधींनीही महापौर आणि पालिका प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले. आरोप-प्रत्यारोपांच्या या गदारोळात 'प्रजा' संस्थेने प्रसिद्ध केलेला मुंबई महानगरपालिकेच्या नागरी सेवा, पर्यावरण आणि हवामानविषयक स्थितीचा २०२६ चा अहवाल फारसा चर्चेत आला नाही. प्रत्यक्षात हा अहवाल मुंबईच्या भविष्यासाठी गंभीर इशारा देणारा आहे. अहवालातील आकडेवारी सांगते की, गेल्या दशकात मुंबईकरांच्या नागरी तक्रारींमध्ये तब्बल ५९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०१६ मध्ये ८१ हजारांहून अधिक असलेल्या तक्रारी २०२५ मध्ये १.३० लाखांवर पोहोचल्या. प्रदूषणासंबंधीच्या तक्रारींमध्ये ५३१ टक्के, तर घनकचरा व्यवस्थापनासंबंधीच्या तक्रारींमध्ये २८१ टक्के वाढ झाली आहे. यावरून शहरातील नागरी समस्यांची तीव्रता किती वाढली आहे, याची कल्पना येते. सकारात्मक बाब म्हणजे तक्रार निवारणाचा कालावधी काही प्रमाणात कमी झाला आहे. २०२१ मध्ये तक्रार निकाली काढण्यासाठी सरासरी ४८ दिवस लागत होते, ती मुदत आता ३० दिवसांवर आली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाने तर हा कालावधी ४० दिवसांवरून अवघ्या आठ दिवसांपर्यंत आणला आहे. मात्र, केवळ तक्रारींचा निपटारा जलद होणे म्हणजे समस्या सुटल्या, असे म्हणता येणार नाही. स्वच्छतेच्या बाबतीतही मुंबईची स्थिती समाधानकारक नाही. 'गार्बेज-फ्री सिटी'चा दर्जा मिळवण्यात शहर अपयशी ठरले आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील एक-स्टार दर्जासाठी आवश्यक निकषही पूर्ण करता आलेले नाहीत. मुंबईतील २ हजार ७४९ मोठ्या गृहनिर्माण संस्थांपैकी केवळ ३४७ संस्था आपल्या परिसरात कचऱ्यावर प्रक्रिया करतात. उर्वरित ८७ टक्के संस्था आजही कचरा प्रक्रियेबाबत उदासीन आहेत. विकेंद्रीकृत कचरा व्यवस्थापनाची ही अपयशी अंमलबजावणी भविष्यातील मोठे संकट ठरू शकते. पर्यावरणाच्या आघाडीवर चित्र आणखी चिंताजनक आहे. मिठी नदीतील वाढते प्रदूषण, समुद्रकिनाऱ्यांची ढासळणारी स्वच्छता आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची निकृष्ट कामगिरी यामुळे पर्यावरणीय धोके वाढत आहेत.

अनेक सांडपाणी प्रक्रिया केंद्रांमधून सोडल्या जाणाऱ्या पाण्यातील प्रदूषणाचे प्रमाण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांपेक्षाही अधिक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

पान १ वरुन..

**गेवराई पोलिसांची ...**

क्यूजी-४४९७ क्रमांकाचा भारत बेंझ कंपनीचा हायवा अवैधरित्या वाळूची वाहतूक करताना आढळून आला. पोलिसांनी वाहनासह त्यामधील वाळू असा २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार सुंदर राठोड करीत आहेत.

दुसऱ्या कारवाईत त्याच दिवशी रात्री १०.५० वाजण्याच्या सुमारास गेवराई शहरातील साठेनगर ते मोंढा नाका मार्गावरील पुलाजवळ विनानंबरचा अशोक लिलँड कंपनीचा 'बडा दोस्त' पिकअप अवैधरित्या गौण खनिज (वाळू) वाहतूक करताना आढळून आला. वाहन ताब्यात घेऊन त्यासह ७ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश गव्हाणे करीत आहेत.

या दोन्ही कारवायांमधून गेवराई पोलिसांनी २४ तासांत एकूण २७ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वाखाली ग्रेड पोलीस उपनिरीक्षक श्रीमंत उबाळे, पोलीस हवालदार कल्याण राठोड, गोरक्ष डोके, जितेंद्र ओव्हाळ, रामराजे काकडे, विनोद कुटे, चालक इसाक शेख तसेच राजेंद्र सांगळे यांनी सहभाग घेऊन यशस्वीरीत्या पार पाडली.

**दादांचा शब्द... ...**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना या क्रीडा संकुलासाठी निधी देण्याचा दिलेला शब्द, विद्यमान उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी प्रत्यक्षात उतरवत बीडकरांच्या अपेक्षांची पूर्तता केली आहे.

बीड जिल्ह्यातील क्रीडा विकासाला चालना देण्यासाठी या क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात येत असून, यापूर्वीही या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. आता मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर उर्वरित कामांना वेग मिळणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सातत्याने पाठपुरावा करून प्रशासकीय अडथळे दूर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

बारामतीच्या विकासाचा आदर्श बीडमध्येही निर्माण करण्याचा संकल्प अजितदादा पवार यांनी व्यक्त केला होता. क्रीडा संकुल हा त्या संकल्पाचा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, त्याची पूर्तता करून सुनेत्राताईंनी दादांच्या शब्दाला न्याय दिल्याची भावना बीडकरांमध्ये व्यक्त होत आहे.बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राला नवी ऊर्जा देणारा हा निर्णय भविष्यातील खेळाडूंसाठी आशादायी ठरणार असल्याची भावना क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली.



# शासकीय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करा

## कामकाज वेळेत पूर्ण करण्याचे केंद्रप्रमुख शेख सलमा यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी अजिजपुरा केंद्राची बैठक शिवाजीनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नर्सरी रोड, बीड येथे केंद्रप्रमुख सौ. शेख सलमा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत यू-डायस प्लस, प्रधानमंत्री पोषण आहार योजना आणि उल्लास प संदर्भातील कामकाजाचा आढावा घेऊन सर्व शासकीय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करत निर्धारित कामे वेळेत व अचूकपणे पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी मुख्याध्यापकांना दिल्या.

यावेळी यू-डायस प्लसवरील 'नवीन विद्यार्थी नोंदणी' सुविधेद्वारे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची नोंद तातडीने पूर्ण करून शाळा व विद्यार्थ्यांची सर्व माहिती अद्ययावत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. प्रधानमंत्री पोषण आहार योजनेची काटेकोर अंमलबजावणी करून सर्व नोंदी नियमित ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच उल्लास पवर प्रत्येक शाळेने आपल्या परिसरातील किमान २० निरक्षर नागरिकांची नोंद करून हे काम प्राधान्याने पूर्ण करण्याचे आवाहन सौ. शेख सलमा यांनी केले.

बैठकीत केंद्रप्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल सौ. शेख सलमा यांचा उपस्थित जिल्हा परिषद व खाजगी शाळांच्या मुख्याध्यापकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. विविध शैक्षणिक व प्रशासकीय विषयांवरील मार्गदर्शनामुळे बैठक उपयुक्त ठरली.




# छत्री, हरिपाठ व मिष्टान्न वाटपातून वारकऱ्यांची सेवा

राहुरी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र रामेश्वर (धांदरफळ बु.) येथून पंढरपूरकडे निघालेल्या २३ व्या पंचक्रोशी वारकरी दिंडीचे राहुरी फॅक्टरी येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने छत्री, हरिपाठ व मिष्टान्न वाटप करून स्वागत करण्यात आले. राज्याध्यक्ष विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे व मनोज साळवे यांच्या हस्ते सेवा उपक्रम पार पडला. यावेळी परिघा आरोटे, सोनेरी विश्वास आरोटे, छत्रपती विश्वास आरोटे आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद सदस्य इंजी. रामहरी कातोरे यांनी या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक करून पत्रकार संघाच्या सामाजिक बांधिलकीचे अभिनंदन केले. दिंडीचे मार्गदर्शन ह.भ.प. सुदाम महाराज कोकणे यांनी केले. प्रस्थानापूर्वी अनिलराव प्रतापराव देशमुख यांच्या हस्ते श्री रामेश्वराचा अभिषेक झाला. ॲड. माधवराव कानवडे, संपतराव विष्णु डोंगरे, पांडुशेठ दामोदर घुले व रोहिदास गेनुजी डेरे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. विश्वास आरोटे, परिघा आरोटे व अनिल कोळसे यांचा सत्कार करण्यात आला. वारकऱ्यांनी पत्रकार संघटनेच्या सेवाभावी उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



# पाटोद्यात श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे भक्तिमय स्वागत

पाटोदा । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र आपेगाव (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) येथून पंढरपूरकडे निघालेल्या सुमारे ८५० वर्षांची परंपरा लाभलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी-दिंडीचे मंगळवारी पाटोदा शहरात भक्तिमय वातावरणात आगमन झाले. विठ्ठल नामाच्या जयघोषात आणि टाळ-मृदंगाच्या गजरात पालखीचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

## आ. सुरेश धस यांनी घेतले दर्शन

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या पालखी सोहळ्यात आमदार सुरेश धस यांनी पालखीचे मनोभावे दर्शन घेऊन वारकऱ्यांचे स्वागत केले.

यावेळी पाटोदा शहराचे नगराध्यक्ष, माजी नगराध्यक्ष, नगरसेवक, स्थानिक पदाधिकारी, पत्रकार संघाचे अध्यक्ष तसेच मोठ्या संख्येने नागरिक व भाविक उपस्थित होते. पालखीच्या स्वागतासाठी शहरात विविध ठिकाणी वारकऱ्यांसाठी सेवा व्यवस्था करण्यात आली होती. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषाने पाटोदा नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली.

# वारकऱ्यांच्या सेवेत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ

## रेनकोट, हरिपाठ पुस्तिका व प्रसादाचे वाटप

अकोले । प्रतिनिधी

श्री क्षेत्र अगस्ती महाराज आश्रम ते पंढरपूर पायी पालखी सोहळ्यात सहभागी वारकऱ्यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने रेनकोट, हरिपाठ पुस्तिका व प्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी वारकऱ्यांना शुभेच्छा देत वारकरी संप्रदायाची भक्ती, समता व सेवाभावाची परंपरा



प्रेरणादायी असल्याचे सांगितले. पत्रकारिता ही समाजसेवेचेही प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी नमूद केले.याप्रसंगी अगस्ती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष के. डी. धुमाळ, पायी पालखी सोहळ्याचे अध्यक्ष ह.भ.प. राजेंद्र महाराज देशमुख, विश्वस्त दीपक महाराज देशमुख, गणेश महाराज वाकचौरे, विणेकरी गंगा बाबा वाकचौरे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले, तालुका उपाध्यक्ष जगन्नाथ आहेर, कळसचे सरपंच राजेंद्र गवांदे, सुगावचे माजी सरपंच सुनील देशमुख, विनेश देशमुख तसेच पत्रकार संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.वारकऱ्यांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# अहिल्यानगर पोलीस दलात १५ अधिकाऱ्यांच्या बदल्या

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील एक पोलीस निरीक्षक, दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि १२ पोलीस उपनिरीक्षक अशा एकूण १५ अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी याबाबतचे आदेश जारी केले असून, सर्व अधिकाऱ्यांना पदग्रहण अवधी न घेता तात्काळ रुजू होण्याचे निर्देश दिले आहेत.

आदेशानुसार, पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांची नियंत्रण कक्षातून जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांची अप्पर पोलीस अधीक्षकांचे वाचक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, मंगेश गोंटला यांची राहुरी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

## तात्काळ रुजू होण्याचे आदेश

पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे (अहिल्यानगर तालुका), अजय कौटे (एमआयडीसी), समाधान फडोळे (अकोले), संदीप शिंदे (नेवासा), रसुल शेख (श्रीगोंदा), आजिनाथ बटुळे (कर्जत), परसराम तागड (राजूर), हर्षवर्धन बहिर (श्रीरामपूर शहर), किरण जगदाळे (मिरजगाव), विजयकुमार कोठावळे (बेलवंडी), किरण शेलार (वाहतूक शाखा, शिर्डी) आणि अशोक खेडकर (खर्डा) यांचीही बदली करण्यात आली आहे.

बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांनी तात्काळ नवीन ठिकाणी हजर होऊन अनुपालन अहवाल पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५२६ दि.१६.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सोहम नानासाहेब मरकड , रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सोहम नानासाहेब मरकड | मुलगा | १०.१०.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५२७ दि.१६.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री परमेश्वर बप्पासाहेब मरकड, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पुष्कर परमेश्वर मरकड | मुलगा | ०५.१०.२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५२४ दि.१६.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री शामराव नामदेव मरकड, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सार्थक शामराव मरकड | मुलगा | २८.०३.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५२४ दि.१६.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शामराव नामदेव मरकड, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आराधना शामराव मरकड | मुलगी | ०७.०५.२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१५२८ दि.१६.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नानासाहेब बप्पासाहेब मरकड , रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | साक्षी नानासाहेब मरकड | मुलगी | १०.१०.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देणार : शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण

## बीड जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळास दिले आश्वासन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या नूतन प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण यांची बीड जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने सदिच्छा भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत जिल्ह्यातील शिक्षकांचे विविध प्रलंबित प्रश्न मांडण्यात आले. त्यावर सकारात्मक भूमिका घेत शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी शिक्षकांचे सर्व प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले.



बैठकीत शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान पवार यांनी निवडश्रेणीचे प्रलंबित प्रस्ताव, वरिष्ठ वेतनश्रेणी, वैद्यकीय बिले, एनपीएसची रक्कम वेळेत जमा करणे, पेन्शन प्रस्ताव निकाली काढणे, शिक्षकांचे वेतन वेळेवर अदा करणे, शाळेच्या वेळेत अनावश्यक माहिती न मागविणे तसेच निलंबित शिक्षकांना पदस्थापना देणे आदी महत्त्वाच्या प्रश्नांकडे शिक्षणाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

यावेळी जयश्री चव्हाण यांनी शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा करत शिक्षकांच्या अडचणी समजून घेतल्या आणि सर्व प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने सोडविण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

बैठकीनंतर शिक्षक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या बैठकीस राज्य प्रतिनिधी नामदेव शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष जीवन बागलाने, जिल्हा संघटक बप्पासाहेब देवगुडे, जिल्हा उपाध्यक्ष बिभिषण हावळे, परमेश्वर बिडवे, किसन झोडगे, जिल्हा सल्लागार शामराव मुळे, शिवाजी जगताप, जिल्हा प्रवक्ते महादेव घोडके, तालुका कार्याध्यक्ष दिगांबर देवकते, तालुका उपाध्यक्ष जीवन हाडुळे, वाघमारे सर, प्रमोद कोल्हे, लक्ष्मण भोसले, सतीश बोबडे तसेच महिला आघाडीच्या प्रतिनिधी उषाताई मुंडे, सुनिता नाईक, वैशाली आकुशकर, कविता भायगुडे यांच्यासह शिक्षक संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत माजलगावातील अनेकांचा शिवसेनेत प्रवेश

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील उबाठा गटातील अनेक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी भरत गोगावले, संगीता ठोंबरे, आनंद परांजपे, मनोज शिंदे, अनिलदादा जगताप व सचिन मुळूक उपस्थित होते. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नवप्रवेशितांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

राम आनंद जगताप, अविनाश गोंडे, ईश्वर होके, शिवकुमार माने, उद्धवराव धुमाळ, बबन पवार, रणजीत जोगडे, कुणाल सोळंके, अंगद खेत्री, जगन्नाथ खेत्री, मोहन थावरे, मनोज थावरे, राजेभाऊ पाष्टे, अर्जुन पांढरपोटे



व बाळासाहेब तौर यांच्यासह अनेकांनी शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेशामुळे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणखी वाढल्याचा दावा पक्षाकडून करण्यात आला आहे.

# केंद्रप्रमुखांना दोन दिवसांचे प्रशिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी जिल्हा परिषदेचा पुढाकार




## 'निपुण भारत' अंतर्गत तालुकानिहाय बैठका, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांची माहिती

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात नव्याने नियुक्त झालेल्या केंद्रप्रमुखांच्या तालुकानिहाय बैठका घेऊन त्यांना दोन दिवसांचे प्रशिक्षण दिले जाणार असून, त्याद्वारे जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत, अशी माहिती नूतन शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण यांनी दिली.

'निपुण भारत' अभियानांतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई आणि शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या निर्देशानुसार प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यापूर्वी आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यांतील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसंदर्भात आष्टी येथे विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, शिक्षक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांच्या सहभागातून गुणवत्ता वृद्धीसाठी विधायक निर्णय घेण्यात आले.

यावर्षी सरळसेवा व पदोन्नतीद्वारे नियुक्त झालेल्या केंद्रप्रमुखांना शैक्षणिक नेतृत्व, शाळा व्यवस्थापन आणि गुणवत्ता वृद्धीच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी तालुकानिहाय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी सांगितले. या प्रशिक्षणातून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाला अधिक चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# वारंवार वीज खंडित, प्रभाग ७ मधील नागरिकांचा संताप

## महावितरणकडे निवेदन; तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर नगरसेवक जगदीश गुरखुदे व नगरसेविका भाग्यश्री सागर देशपांडे यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता राजपूत यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

निवेदनानुसार, सावरकर शाळा परिसर, सराफ रोड, बोबडेश्वर गल्ली, छापखाना गल्ली, थिगळे गल्ली, जटाशंकर गल्ली, झेंड गल्ली, काळे गल्ली, माजी आमदार देशमुख गल्ली तसेच चुन गल्ली डीपी



परिसरात नदीपात्रातून जाणाऱ्या वीजवाहिन्या, झाडांच्या फांद्या आणि डीपीवरील वाढलेला भार यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे.

या समस्येमुळे नागरिक, विद्यार्थी, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासावरही परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नदीपात्रातील वीजवाहिन्यांचे स्थलांतर, आवश्यकतेनुसार डीपीचे स्थलांतर आणि वाढलेला विद्युत भार कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# भारतीय हवामान विभागाचा १४ ते १७ जुलै दरम्यानचा इशारा

## मेघगर्जना, विजांचा कडकडाट, शेतकरी व नागरिकांनी सतर्क राहावे

पुणे । प्रतिनिधी

भारतीय हवामान विभागाच्या कृषी हवामान विभागाने महाराष्ट्रासाठी जारी केलेल्या कृषी हवामान सूचना पत्रकानुसार १४ ते १७ जुलैदरम्यान राज्यातील काही भागांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी जोरदार वाऱ्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांनी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार १४ जुलै रोजी कोकण व विदर्भ, १५ जुलै रोजी कोकण व मध्य महाराष्ट्र, १६ जुलै रोजी मध्य महाराष्ट्र, तर १७ जुलै रोजी विदर्भातील तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी व नागरिकांनी मेघगर्जनेच्या काळात शेतातील कामे शक्यतो टाळावीत. मोकळ्या जागेत उभे राहणे, झाडाखाली किंवा अपूर्ण बांधकामांचा आसरा घेणे टाळावे. तसेच वीज कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन विद्युत व इलेक्ट्रॉनिक उपकरणे प्लगमधून वेगळी करावीत, असेही हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

कृषी सल्ल्यानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकऱ्यांनी मेघगर्जना व जोरदार वाऱ्याच्या कालावधीत जनावरे सुरक्षित गोठ्यात किंवा संरक्षित ठिकाणी बांधावीत.

दरम्यान, या हवामान परिस्थितीमुळे पिकांवर कोणताही विशेष प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता नसल्याचे कृषी हवामान विभागाने नमूद केले आहे. मात्र, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेच्या पार्श्वभूमीवर जीवितहानी टाळण्यासाठी सर्वांनी हवामान विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# विशेष शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज सादर करावेत

बीड (जिमाका) :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत (मर्या.) राबविण्यात येणाऱ्या विशेष शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन बीड जिल्हा कार्यालयाकडून करण्यात आले आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अशा विविध अभ्यासक्रमांमध्ये ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातींमधील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रासह दि. २३ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक अभ्यासक्रमातील प्रथम ३ ते ५गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. ही शिष्यवृत्ती महामंडळाकडून विद्यार्थ्यांची ज्येष्ठता आणि सर्वाधिक गुण क्रमांकानुसार उपलब्ध निधीच्या अधीन राहून मंजूर केली जाईल. विहित मुदतीनंतर म्हणजेच २३ जुलै २०२६ नंतर आलेल्या कोणत्याही अर्जांचा किंवा कागदपत्रांचा जिल्हा कार्यालयामार्फत स्वीकार केला जाणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. पात्र विद्यार्थ्यांनी वरील सर्व कागदपत्रांच्या दोन प्रतींसह साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), बीड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, बीड या जिल्हा कार्यालयाच्या पत्त्यावर वेळेत संपर्क साधून आपले अर्ज दाखल करावेत. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जिवंत व्यक्तीला 'मृत' ठरवून मतदान यादीतून नाव वगळले

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील फुले पिंपळगाव येथील रहिम शेख चाँद शेख यांना जिवंत असतानाही मतदान यादीत मृत दाखवून नाव वगळल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित बीएलओ किरण माने यांच्यावर निलंबन व फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली असून, कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त कार्यालय, मुंबई येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

तक्रारदाराने आधार कार्ड, ई-केवायसी, मतदान ओळखपत्रासह आवश्यक कागदपत्रे सादर करूनही नाव पुन्हा समाविष्ट करण्यात आले नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मतदानाच्या मूलभूत अधिकारावर गदा आल्याचा दावा करत संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. निवेदनाच्या प्रती भारत निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार माजलगाव यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# मतदार नोंदीसाठी पालकांचे एसआयआर अनिवार्य



निवडणूक आयोगाने मतदार यादीत नाव नोंदवू इच्छिणाऱ्या नवीन मतदारांना फॉर्म ६ सोबत आपल्या पालकांचे 'एसआयआर' तपशील जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मतदार नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ करण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे.

अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, या नव्या नियमासाठी मूळ फॉर्म ६ मध्ये कोणतीही सुधारणा किंवा दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्याऐवजी नवीन मतदारांना फॉर्म ६ सोबत एक स्वतंत्र घोषणापत्र भरून द्यावे लागत आहे. गेल्यावर्षी जून महिन्यात बिहारमध्ये राबवण्यात आलेल्या 'एसआयआर' मोहिमेदरम्यान या घोषणेचा सर्वप्रथम समावेश करण्यात आला होता. ऑनलाईन पद्धतीने फॉर्म ६ भरताना जोपर्यंत अर्जदार हे घोषणापत्र पूर्ण करत नाही, तोपर्यंत त्याला अर्जाची पुढील प्रक्रिया पूर्ण करता येत नाही.

अर्जाची छाननी सोपी होणार

निवडणूक आयोगाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, बिहारमधील दैनंदिन एसआयआर बुलेटिनवरून असे दिसून आले आहे की, नवीन मतदारांनी या घोषणापत्रासह आपले अर्ज यशस्वीरीत्या सादर केले आहेत. या नवीन पद्धतीमुळे मतदारांचे मॅपिंग करणे अत्यंत सोपे होणार आहे. तसेच, पालकांच्या तपशिलांमुळे नवीन मतदारांना अर्ज करताना द्याव्या लागणाऱ्या इतर कागदपत्रांची संख्यादेखील कमालीची कमी होणार आहे.

नवीन मतदारांना आता नाव नोंदणीसाठी फॉर्म ६ सोबत पालकांचे एसआयआर तपशील देणे बंधनकारक राहील. २ कागदपत्रांची कटकट कमी: पालकांच्या माहितीमुळे नवीन अर्जदारांना द्याव्या लागणाऱ्या इतर पुराव्यांची संख्या कमी होणार आहे. ऑनलाईन अर्जासाठी सक्ती ऑनलाईन फॉर्म ६ भरताना हे घोषणापत्र भरल्याशिवाय अर्ज पुढे सबमिट करता येणार नाही. आयोगाकडून आरोप फेटाळले : 'एसआयआर' प्रक्रियेत कोणताही भेदभाव झाला नसून ही मोहीम पूर्णपणे घटनात्मक आणि पारदर्शक असल्याचा दावा आयोगाने केला आहे.

## मतदार यादीतून तुमचे नाव गायब होणार?

# अपूर्ण पत्त्यांमुळे तब्बल ५० लाख मतदारांसमोर मोठे संकट




मतदार यादीमधील पत्ते अपूर्ण असल्याने जिल्ह्यात आतापर्यंत लाखो मतदारांपैकी केवळ काही मतदारांनाच गणना अर्ज वाटण्यात आले आहेत. एकूण मतदारसंख्येच्या हे प्रमाण केवळ ४३ टक्केच आहे.

जिल्ह्यात लाखो मतदार असून, या मोहिमेत प्रत्येक मतदाराला स्वतंत्र गणना अर्ज देण्याचे काम येत्या २९ जुलैपर्यंत करायचे आहे. जिल्ह्यात आतापर्यंत केवळ काही मतदारांना गणना अर्ज दिले आहेत. कामाचा व्याप आणि अडचणी लक्षात घेता, प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने मुदतवाढ द्यावी, अशी मागणी बीएलओंकडून होत आहे.

ज्या मतदारांकडून वेळेत गणना अर्ज भरून घेतले जाणार नाहीत, अशा मतदारांना प्रशासनातर्फे स्थलांतरित म्हणून घोषित केले जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर त्यांचे नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी मतदारांना सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागेल, तसेच योग्य कागदपत्रांची पडताळणी झाल्याशिवाय त्यांचे नाव यादीत समाविष्ट केले जाणार नसल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

### संकेतस्थळावर ९ टक्के अर्ज अपलोड; उर्वरित लाखो मतदारांपर्यंत पोहोचण्याचे बीएलओंसमोर मोठे आव्हान

राज्यात सुरू असलेल्या मतदार यादी विशेष पुनरावलोकन मोहिमेत अर्ज अपलोड करण्याच्या प्रक्रियेला अपेक्षित गती मिळालेली नसल्याचे समोर आले आहे. सध्या संकेतस्थळावर अर्ज अपलोड करण्याचे प्रमाण केवळ ९ टक्के इतकेच असल्याने उर्वरित लाखो मतदारांपर्यंत पोहोचून त्यांचे अर्ज निश्चित मुदतीत संकलित व अपलोड करण्याचे मोठे आव्हान पुढील १५ दिवसांत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यासमोर उभे ठाकले आहे.

### शेजारीही ओळखत नाहीत.

या मोहिमेतील अडचणींबाबत नाव न छापण्याच्या अटीवर एका बीएलओने सांगितले, की अनेक मतदारांचे पत्ते अपूर्ण आहेत. अशा मतदारांना आजूबाजूचे इतर मतदारही ओळखत नाहीत, तसेच त्यांचे मोबाइल क्रमांक उपलब्ध नसल्याने त्यांच्याशी संपर्क साधणे अशक्य झाले आहे. सुरुवातीच्या पहिल्या आठवड्यात मतदारांना या मोहिमेची पुरेशी कल्पना नसल्याने प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, आता राजकीय पक्षांकडून आवाहन केले जात असल्याने मतदारांचा प्रतिसाद वाढला असून, अर्ज वाटपाचा वेग वाढेल, अशी आशा आहे.

# दान चोरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची राममंदिर ट्रस्टला नोटीस

अयोध्येतील राम मंदिराचे दान चोरीचे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आज या प्रकरणावर सुनावणी करताना रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टला नोटीस बजावली आहे.




राम मंदिर चोरी प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश (उगख) सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर झाली. खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारने दिलेल्या एसआयटी तपासाचा स्टेटस रिपोर्ट मागवला आहे.

न्यायालयाने आजच्या सुनावणीत, 'आम्ही उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या एसआयटीला स्टेटस रिपोर्ट सादर करण्याचे निर्देश देतो. सोमवारी पुढील सुनावणीसाठी या प्रकरणाची यादी करा आणि स्टेटस रिपोर्टमध्ये एसआयटीच्या स्थापनेची माहिती द्या असे आदेश दिले आहेत.सुनावणीदरम्यान एका वकिलाने न्यायालयाला सांगितले की, उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन केली आहे. यावर सॉलिसिटर जनरल म्हणाले की ते उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने हजर होत आहेत.न्यायालयाने विचारले की ते केंद्र सरकारची नोटीस देखील स्वीकारतील का, ज्याला त्यांनी सहमती दर्शविली. मात्र, नंतर न्यायालयाने स्पष्ट केले की, सध्या केवळ ट्रस्टला नोटीस बजावली जात आहे. केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारला स्वतंत्र नोटीस बजावण्यात आली नाही.सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयाला सांगितले की, केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकार या प्रकरणी न्यायालयाला सर्वतोपरी मदत करतील. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी येत्या सोमवारी निश्चित केली आहे. तोपर्यंत एसआयटीला आपला स्टेटस रिपोर्ट कोर्टात सादर करावा

# ना.पंकजाताई मुंडे यांचा १५ पासून बीड जिल्हा दौरा

## उद्या जिल्हाधिकारी कार्यालयात घेणार वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाचा आढावा

गेवराईत नगरपरिषदेचे कार्यक्रम; विविध विकास कामांचा आढावा, बैठका व उद्घाटन आदी कार्यक्रमाना उपस्थिती

परळी /प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे हया उद्या १५ जुलै पासून बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. उद्या दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयात परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकासाचा त्या आढावा घेणार आहेत. त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील विविध विकास कामांचा आढावा, शासकीय बैठका, उद्घाटन समारंभ तसेच कार्यकर्ते व नागरिकांच्या भेटीगाठी असा त्यांचा विस्तृत दौरा कार्यक्रम असणार आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या दौऱ्याची सुरुवात १४ जुलै रोजी मुंबईहून छत्रपती संभाजीनगर येथे आगमनाने होणार आहे. त्यानंतर १५ जुलै रोजी त्या गेवराई येथे विविध विकासकामांचा आढावा घेणार आहेत. यावेळी नगर परिषद सभागृहात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच पाडळशिंगी (ता. गेवराई) येथे सुपरलक्ष्मी गोल्ड चक्की आटा उद्योगाच्या शुभारंभ कार्यक्रमालाही त्या उपस्थित राहणार आहेत. यानंतर दुपारी २ वाजता बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयात परळी वैजनाथ



तीर्थक्षेत्र विकासा संदर्भातील मंजूर आराखड्या संबंधाने आढावा बैठक घेणार आहेत.परळी वैजनाथ येथील श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारने ३०१.५४ कोटी रुपयांच्या सुधारित विकास आराखड्याला मंजुरी दिली असून या योजनेसह जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांच्या कामांचा आढावा त्या घेणार आहेत. दुपारी चार वाजता नगर रोड परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या ‘सह्याद्री फॅमिली रेस्टॉरंट’चे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी बीड, गेवराई आणि आष्टी मतदारसंघातील कार्यकर्ते व नागरिकांच्या भेटीसाठी वेळ राखीव ठेवण्यात आला असून त्यानंतर त्या परळी वैजनाथकडे रवाना होतील.

१६ जुलै रोजी सकाळी ११ ते १ परळी-माजलगाव मतदारसंघातील नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींसाठी परळी वैजनाथ येथील विशेष शासकीय विश्रामगृहात वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. तर १७ जुलै रोजी अंबाजोगाई येथे ‘जस्ट नॅचरल्स’ या सेंद्रिय कृषी व नैसर्गिक उत्पादनांच्या शॉपचे उद्घाटन ना. मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर केज मतदारसंघातील नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन त्या पुन्हा परळी वैजनाथ येथे दाखल होतील. सायंकाळी परळी शहर व ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या भेटींसाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे.

# रोशनगाव येथे तीव्र पाणीटंचाई

## रोशनगावच्या पाणी पुरवठ्यासाठी तातडीने १० लाखांच्या निधीची जिल्हाधिकार्यांकडे मागणी

धर्माबाद प्रतिनिधी

तालुक्यातील रोशनगाव येथे गेल्या आठ दिवसांपासून पाणी पुरवठा पूर्णपणे ठप्प झाल्याने गावावर तीव्र पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. या गंभीर समस्येचे निवारण करण्यासाठी रोशनगावच्या वतीने सरपंच प्रतिनिधी शिवराज माधवराव भडंगे, सामाजिक कार्यकर्ते युवा नेते साईनाथ शंकरराव जाधव, नागनाथ गंगाधर माळगे यांनी आज जिल्हाधिकार्यांची भेट घेऊन त्यांना रीतसर निवेदन सादर केले. डी.पी.डी.सी. अंतर्गत गावाला तात्काळ १० लाख रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.



रोशनगावच्या पाणी पुरवठ्यासाठी गोदावरी नदीच्या पात्रात विहीर उपलब्ध आहे. मात्र, बाभळी बंधार्याचे गेट उचलल्यामुळे गोदावरी नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे पडले आहे. नदीत पाणीच नसल्याने गेल्या आठ दिवसांपासून संपूर्ण गाव पाण्यासाठी वणवण करत आहे.सध्या नदीचे पात्र कोरडे असल्याने प्रशासनाला तांत्रिक कामे करणे सोपे जाणार आहे. नदी पात्रातून अंडरग्राउंड (भूमीगत) पाईपलाईन टाकून जर त्या विहिरीचे कनेक्शन मुख्य पुरवठ्याशी जोडले, तर भविष्यात गावाला कधीही पाणी कमी पडणार नाही, असा तांत्रिक पर्याय गावकऱ्यांच्या वतीने निवेदनात सुचवण्यात आला आहे.

नदी कोरडी असल्याच्या स्थितीचा फायदा घेऊन प्रशासनाने युद्धपातळीवर हे काम हाती घ्यावे आणि रोशनगावच्या नागरिकांना या भीषण पाणीटंचाईतून मुक्त करावे, अशी आर्त हाक सरपंच प्रतिनिधी शिवराज भंडगे, डॉ.भगवानराव मनुरकर , साईनाथ पाटील जाधव, नागनाथ पाटील माळगे व गावकऱ्यांनी जिल्हाधिकार्यांना दिलेल्या निवेदनातून दिली आहे. यावर जिल्हा प्रशासन काय पावले उचलते, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# हॉटेल गोल्डन चॉईसमध्ये १५ जुलैपासून रुचकर नॉनव्हेज जेवणाची खास मेजवानी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले हॉटेल गोल्डन चॉईस आता आपल्या खाद्यप्रेमींसाठी आणखी एक आकर्षक सुविधा घेऊन येत आहे. १५ जुलैपासून हॉटेलमध्ये स्वादिष्ट नॉनव्हेज पदार्थांची विशेष व्यवस्था सुरू होत असून, चिकन, मटण, अंडी, बिर्याणी, फ्रायसह विविध चविष्ट पदार्थ ग्राहकांना उपलब्ध होणार असल्याची माहिती हॉटेल व्यवस्थापनाने दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून उत्कृष्ट शाकाहारी जेवण आणि दर्जेदार नाश्त्यासाठी ओळख असलेल्या हॉटेल गोल्डन चॉईसमध्ये ग्राहकांकडून सातत्याने नॉनव्हेज पदार्थांची मागणी होत होती. त्याची दखल घेत व्यवस्थापनाने आता नॉनव्हेज मेनूची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे.

हॉटेलमध्ये स्वच्छता, दर्जा आणि चव यांना प्राधान्य देत तज्ज्ञ आचारींकडून तयार केलेले विविध नॉनव्हेज पदार्थ ग्राहकांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून दिले जाणार आहेत. घरगुती चव, उत्तम सेवा आणि दर्जेदार खाद्यपदार्थ हीच हॉटेलची खास ओळख असल्याने एकदा येथे भोजन करणारे ग्राहक पुन्हा पुन्हा भेट देतात.

१५ जुलैपासून सुरू होणाऱ्या या नव्या सुविधेचा लाभ घ्यावा आणि आपल्या कुटुंबीय व मित्रांसह रुचकर नॉनव्हेज जेवणाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन हॉटेल गोल्डन चॉईसच्या व्यवस्थापनाने केले आहे.




# २६ जुलै रोजी होणाऱ्या मराठवाडा व्यापारी परिषदेच्या पूर्वनियोजन बैठकीस धर्माबाद येथे उत्स्फूर्त प्रतिसाद

## व्यापार, उद्योगवृद्धी आणि मराठवाड्याच्या आर्थिक विकासावर सखोल चर्चा

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद येथे दि. २६ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या २९ व्या मराठवाडा व्यापारी परिषदेच्या पूर्वनियोजनार्थ मराठवाडा व्यापारी महासंघाच्या वतीने मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्स ची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

या बैठकीत २६ जुलै रोजी होणाऱ्या व्यापारी परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक नियोजन, व्यापारी बांधवांचा सहभाग, उद्योगवृद्धी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, व्यवसाय विस्तार, उद्योजकांसाठी उपलब्ध नवीन संधी तसेच व्यापारी संघटनांचे सक्षमीकरण या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ही बैठक व्यापारी व उद्योजकांना दिशा देणारी, परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ करणारी आणि मराठवाड्याच्या व्यापार व उद्योग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरली. यावेळी




मराठवाड्याच्या आर्थिक प्रगतीसाठी सर्व व्यापारी व उद्योजकांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीस मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे अध्यक्ष श्री आदेशपालजी छाबडा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच महासचिव श्री श्यामसुंदरजी लोहिया, वरिष्ठ उपाध्यक्ष श्री सुरेंद्रजी रेदासनी, जिल्हा सचिव श्री नागनाथजी अनंतवाड, श्री विकास साहू, श्री जाफरजी मिर्झा, श्री संतोष कावळे व श्री संदीपजी लाहोटी उपस्थित होते. त्यांनी धर्माबाद व्यापारी संघटनेच्या कार्याची माहिती जाणून घेत समाधान व्यक्त केले.

यावेळी नांदेड व्यापारी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष श्री सुबोधजी काकानी यांनी २९ व्या मराठवाडा व्यापारी परिषदेचे आयोजन धर्माबाद येथे होत असल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. तसेच लातूर, धाराशिव (उस्मानाबाद), बीड, परभणी, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर तसेच यजमान नांदेड जिल्ह्यातील व्यापारी बांधवांनी २६ जुलै रोजी होणाऱ्या परिषदेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

या बैठकीस धर्माबाद येथील मुरलीधरजी नागला, राजगोपाल झंवर, अमिरोद्दीन शेठ, आनंद पाटील शिंदे, माधवजी बिजमवार, व्यंकटेश गादेवार, कालूशेठ झंवर, पांडुरंग पाटील, मन्मथ अप्पा, स्वामी, किशोर चिद्रावार, परेश चिंतावार, विठ्ठलराव चिलकेवार यांच्यासह मोठ्या संख्येने व्यापारी बांधव उपस्थित होते.

धर्माबाद व्यापारी संघटनेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री प्रशांत गंजेवार यांनी केले, तर आभार श्री नागनाथजी अनंतवाड यांनी मानले. २६ जुलै रोजी होणाऱ्या २९ व्या मराठवाडा व्यापारी परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी ही पूर्वनियोजन बैठक अत्यंत फलदायी ठरल्याची भावना उपस्थित व्यापारी बांधवांनी व्यक्त केली.

## विविध घटकांना मध केंद्र योजनेसाठी आवाहन

बीड (जिमाका) :- महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यात १८ जून २०१९ पासून मध केंद्र योजना (मधुमक्षिकापालन) राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत बीड जिल्ह्यातील पात्र व्यक्ती आणि संस्थांकडून लाभासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, युवक, युवती आणि संस्थांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी डी.व्ही. फताटे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या मध केंद्र योजना (मधुमक्षिकापालन) अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकरी, युवक आणि संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेद्वारे लाभार्थ्यांना मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण, साहित्यासाठी ५० टक्के अनुदान आणि उत्पादित मधाला शासनाचा हमीभाव दिला जाईल. इच्छुक वैयक्तिक मधपाळांचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असावे आणि शेती असलेल्यांना प्राधान्य मिळेल. प्रगतीशील मधपाळ किंवा संस्थांना केंद्रचालक म्हणून सहभागी होता येईल. यासाठी दहावी उत्तीर्ण असणे, १ एकर जमीन किंवा १००० चौ. फुटांची इमारत असणे आवश्यक आहे. निवड झाल्यानंतर प्रशिक्षणापूर्वी मंडळाला बंधपत्र लिहून देणे अनिवार्य राहील. अधिक माहिती व अर्जासाठी जिल्हा ग्रामोद्योग कार्यालय, बीड किंवा भागवत रुपनर (९४२००१६२७९) यांच्याशी संपर्क साधावा. असेही कळविले आहे.

# संपूर्ण महाराष्ट्रातील मोकाट कुत्रे पूर्वमंत्री मनेका गांधी यांच्या निवासस्थानी नेऊन सोडा

## पत्रकार रणरागिणी आयेशा शेख यांच्यासह महिलांचे शासनाला साकडे

बीड (प्रतिनिधी) - संपूर्ण महाराष्ट्रभरातील मोकाट कुत्रे जमा करून पूर्वमंत्री मनेका गांधी यांच्या दिल्ली स्थित निवासस्थानी नेऊन सोडा असे साकडे पत्रकार रणरागिणी असलेल्या आयशा शेख यांच्यासह महिलांनी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, संरक्षण मंत्री, आरोग्य मंत्री, विभागीय आयुक्त यांना घातले आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, केंद्र सरकारमध्ये केंद्रीय मंत्रीपदी असताना पूर्वमंत्री मनेका गांधी यांनी मानवाला अत्यंत त्रासदायक असा कायदा करून कुत्र्यांना अभय देणारा कायदा करून ठेवला आहे. या कायद्याची अंमलबजावणी करताना शासकीय व प्रशासकीय स्तरावर मोकाट कुत्र्यांच्या वावरण्यावर कोणतीही प्रतिबंधित प्रक्रिया केली जात नाहीये. किंबहुना मोकाट कुत्र्यांविषयी मोठ्या प्रमाणात उदासीनता आल्याने गेल्या काही वर्षात मोकाट कुत्र्यांची संख्या मानवापेक्षा जास्त जलद गतीने वाढत आहे. शिवाय प्रचंड संख्येने वाढलेले मोकाट कुत्र्यांचे कळपच्या कळप गल्लीबोळासह मुख्य रस्ते आणि महामार्गांवर सुद्धा मोठ्या संख्येने २४तास फिरत असल्याचे सहज दिसून येतात आणि रस्त्याने चालणाऱ्या पादचारीसह सायकल, दुचाकी, तीन चाकी च्या मागे भुंकत पळू लागले असून अनेक वेळा ते लहान मुला-मुलींपासून ते वयोवृद्धांपर्यंत माणसांवर हल्ले करू लागले आहेत. आतापर्यंत अशा प्रकारे अनेकांवर मोकाट



कुत्र्यांचे हल्ले झालेले आहेत. मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्याचे परिणाम म्हणून आतापर्यंत अनेक जण जखमी झाले असून काही जणांच्या प्राणांवर सुद्धा बेतलेले आहे. मोकाट कुत्र्यांची संख्या कमी व्हावी म्हणून त्यांच्या वाढणाऱ्या संख्येवर अंकुश लावणे अत्यंत गरजेचे व आवश्यक झाले आहे. मात्र असे होताना दिसत नसल्याने कुत्र्यांविषयी कायदा करणाऱ्या पूर्व मंत्री मनेका गांधी यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील कुत्रे जमा करून पूर्ण बंदोबस्तात सोडावे. तेव्हाच एकतर मोकाट कुत्र्यांच्या कायद्यात बदल होईल किंवा त्यांच्या वाढणाऱ्या संख्येत कमतरता येईल असे निवेदनात म्हटले आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देताना पत्रकार आयशा शेख यांच्यासह ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अनिताताई वाघमारे, पत्रकार सागरताई इचके आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला

## तालुका क्रीडा संकुल उभारणीचा आढावा

बीड (जिमाका) :- जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंच्या कौशल्याला वाव मिळण्यासाठी त्यांना चांगल्या दर्जाच्या क्रीडा सुविधा मिळणे अत्यंत गरजेचे आहे, तरी जिल्ह्यातील प्रलंबित तालुका क्रीडा संकुलांच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या जागेबाबतच्या कामांच्या प्रक्रीयेला समन्वयातून गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तालुका क्रीडा अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. तर संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते. बैठकीत परळी, शिरुर, आष्टी, पाटोदा, धारुर आणि वडवणी येथील क्रीडा संकुलांच्या जागेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाटोदा, आष्टी व शिरुर या तालुक्यांच्या ठिकाणी क्रीडा संकुलासाठी पर्यायी जागा उपलब्ध आहे का, याची चाचपणी केली. या ठिकाणी नवीन गायरान जमिनीचा शोध घेऊन त्याबाबतचा प्रस्ताव पुढील १५ दिवसांत सादर करण्याचे कडक निर्देश त्यांनी संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच धारुर आणि वडवणी येथील क्रीडा संकुलाच्या जागेबाबत उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य त्या सूचना केल्या. परळी येथील तालुका क्रीडा संकुलासाठी महानिर्मितीच्या अर्थात परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या ताब्यातील जमीन उपलब्ध करून देण्याबाबत पाठपुरावा करण्याचे व त्यासंबंधीची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आमदार श्री शाळा उपक्रमाची घोषणा;आष्टी-पाटोदा-शिरूर मधील जिल्हा परिषद शाळा रोल मॉडेल बनविणार-आ.सुरेश धस



## मिशन निपुण बीड साठी शिक्षकांनी जागतिक दर्जाच्या शाळांचा संकल्प करावा - राष्ट्रपती पुरस्कार विजेते दत्तात्रय वारे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) जिल्हा परिषद बीडचा शिक्षण विभाग आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मिशन निपुण बीड संकल्प कार्यशाळेत जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावणे, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मजबूत करणे आणि सरकारी शाळांना जागतिक दर्जाच्या बनविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यशाळेत आ. सुरेश (आण्णा) धस, राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे आणि बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी आ. सुरेश धस यांनी आमदार श्री शाळा या अभिनव उपक्रमाची घोषणा करत शिक्षण क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात मतदारसंघातील उत्कृष्ट कार्य करणारे शिक्षक, ग्रामस्थ आणि सरपंच यांच्या सहकार्याने निवडक जिल्हा परिषद शाळा दत्तक घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यात येणार असून त्या शाळा रोल मॉडेल म्हणून विकसित केल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, सोमनाथ वाळके आणि संदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष समिती स्थापन करून शाळांच्या विकासाचा रोडमॅप तयार केला जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावण्यात येईल.

कोणत्याही पालकाला आपल्या पाल्याला खाजगी शाळेत पाठविण्याची गरज भासू नये, यासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा, गुणवत्तापूर्ण वातावरण आणि अतिरिक्त शिक्षकांची पदे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही आमदार धस यांनी दिली.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान म्हणाले की, मिशन निपुण बीड या कार्यशाळेचा मुख्य उद्देश शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे हा आहे. आ. सुरेश धस यांचे दर्जेदार शिक्षणावर विशेष लक्ष असून, आता जिल्हा, तालुका आणि केंद्र स्तरावर नियमित कार्यशाळांचे आयोजन करून विद्यार्थी केंद्रित शिक्षणावर भर दिला जाणार आहे. शिक्षकांनी प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांना घडवावे, प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे यांनी शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना सांगितले की, सरकारी शाळांमधून विद्यार्थ्यांचे खाजगी शाळांकडे होणारे स्थलांतर थांबून आता रिव्हर्स मायग्रेशन घडले पाहिजे. पालकांना इंग्रजी बोलणारी, गुणवत्तापूर्ण शिक्षण घेणारी मुले अपेक्षित आहेत. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने शिक्षणाची गुणवत्ता वाढवून शंभर टक्के विद्यार्थी साक्षर करण्याचा संकल्प करावा.

विद्यार्थ्यांना समजून घेणे, विषय मित्र संकल्पना प्रभावीपणे राबविणे, विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना व निरोगी स्पर्धा निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारी शाळाही आंतरराष्ट्रीय दर्जाच्या होऊ शकतात, असे ठामपणे सांगत त्यांनी शिक्षकांना समाजात कायम स्मरणात राहील असे कार्य करण्याचे आवाहन केले. आपल्या गावाला जगाच्या नकाशावर नेण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे गावातील शाळाच असल्याचे त्यांनी सांगितले.

वाबळेवाडी शाळेच्या संघर्षमय प्रवासाची आठवण करून देताना दत्तात्रय वारे यांनी आ. सुरेश धस यांनी दिलेल्या सहकार्याचा विशेष उल्लेख केला. आष्टी-पाटोदा-शिरूर मधील शिक्षक भाग्यवान आहेत. त्यांच्या पाठीशी सह्याद्रीसारखा नेता उभा आहे, असे गौरवोद्गार काढत प्रत्येक शिक्षकाने मी माझी शाळा जागतिक दर्जाची घडवीन असा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेच्या शेवटी उपस्थित सर्व शिक्षकांनी मिशन निपुण बीड यशस्वी करण्याचा तसेच प्रत्येक जिल्हा परिषद शाळा गुणवत्तापूर्ण, आधुनिक आणि जागतिक दर्जाची बनविण्याचा सामूहिक संकल्प केला.

या कार्यशाळेस बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, डाएटचे प्राचार्य डॉ. अनिल मुरकुटे, शिक्षणाधिकारी डॉ. जयश्री चव्हाण, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. भागीरथी गिरी, उपशिक्षणाधिकारी मारुती जाधव, तिन्ही तालुक्यांचे गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, सोमनाथ वाळके, संदीप पवार, नितीन करडुळे, सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, उपक्रमशील शिक्षक, विषयतज्ज्ञ शिक्षक तसेच शिक्षण विभागातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले, तर अण्णासाहेब घोडके यांनी उपस्थितांचे आभार मानले.



धर्माचार्य ह.भ.प. आदिनाथ आंधळे महाराजांकडून

# कडा येथील संत सावता महाराज मंदिर बांधकामाची पाहणी

भक्तांना केले मोलाचे मार्गदर्शन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कडा येथील बाजारतळावर अत्यंत वैभवशाली आणि भव्य दिव्य पद्धतीने साकारत असलेल्या संत श्रेष्ठ सावता महाराज मंदिराच्या बांधकाम प्रवासाला आज एक ऊर्जादायी वंदनीय स्पर्श लाभला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार धर्माचार्य ह.भ.प. आदिनाथ आंधळे महाराज यांनी आज मंदिर निर्माण कार्यास सदिच्छा भेट दिली.

यावेळी त्यांनी सुरू असलेल्या बांधकामाची अतिशय बारकाईने पाहणी केली आणि मंदिर परिसराच्या वास्तू रचनेबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण अशा सूचना व मार्गदर्शन केले.संत सावता महाराजांचे कार्य आणि विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी हे मंदिर आगामी काळात एक मोठे श्रद्धास्थान ठरेल,असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.ह.भ.प.आदिनाथ आंधळे महाराज यांचे मंदिर परिसरात आगमन होताच उपस्थित ग्रामस्थ आणि मंदिर समितीच्या वतीने त्यांचे अतिशय उत्साहात स्वागत करण्यात आले. या मंगलप्रसंगी कडा परिसरातील सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक आजी-माजी मान्यवर आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत आणि पाहणी दौऱ्यावेळी प्रामुख्याने प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, रमेशभाऊ भोजने, दिलीपराव मेहत्रे, बबनराव मेहत्रे, बुरानभाई पठाण,विजयकुमार जाचक, शंकर ढोबळे, शिवा ढोबळे, संतोष ढोबळे, गणेश टिळेकर, श्रीराम राऊत, ज्ञानदेव ढोबळे, अंबादास गायके, धोंडीबा राऊत (मास्तर), संजय दळवी, बाळासाहेब मेहत्रे, छगन घोलप, दादा खंडू भोजने यांच्यासह इतर अनेक भाविक, ग्रामस्थ आणि सावता महाराज मंदिराचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प.आदिनाथ आंधळे महाराजांच्या या भेटीमुळे मंदिर निर्माण कार्यात काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचा आणि भाविकांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. या मंदिराचे काम अत्यंत वेगाने आणि शास्त्रोक्त पद्धतीने पूर्ण करण्याचा संकल्प

# पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंग,ता.आष्टी,जि.बीड येथे आगळावेगळा उपक्रम संपन्न



## आई-वडिलांच्या सहस्रदर्शन सोहळ्यानिमित्त विद्यार्थ्यांना आई-वडिलांच्या वजनाएवढ्या वह्यांचे वाटप

उद्योजक श्री.साधू नेटके व ग्रामपंचायत सदस्य श्री.युवराज नेटके यांनी राबवला एक अनोखा शैक्षणिक उपक्रम

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेतून शाळेचे माजी विद्यार्थी तथा मुंबई येथे यशस्वी उद्योजक म्हणून उद्योग व्यवसाय करणारे श्री. साधू विश्वनाथ नेटके आणि टाकळसिंग ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य श्री. युवराज विश्वनाथ नेटके यांनी आपल्या आई-वडिलांच्या सहस्रदर्शन सोहळ्यानिमित्त एक प्रेरणादायी आणि आगळावेगळा उपक्रम राबवला.

या निमित्ताने त्यांनी आपल्या आई-वडिलांच्या वजनाएवढ्या वह्या पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, टाकळसिंग, ता. आष्टी, जि. बीड येथे भेट देऊन विद्यार्थ्यांना वितरित केल्या.

या उपक्रमांतर्गत सोमवार, दि. १३ जुलै २०२६ रोजी प्रशालेत आयोजित कार्यक्रमात शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना श्री. साधू विश्वनाथ नेटके व श्री. युवराज विश्वनाथ नेटके यांच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मिळालेली ही भेट त्यांच्या शिक्षणासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरली.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना उपस्थित मान्यवरांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या बळावर यश संपादन करावे, असे आवाहन केले. आपल्या गावातील शाळेशी असलेली नाळ जपत सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. महेशकुमार शिंदे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत श्री. साधू विश्वनाथ नेटके व श्री. युवराज विश्वनाथ नेटके यांचे शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी सांगितले की, माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेप्रती जपलेली आत्मीयता आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी दिलेले योगदान इतरांसाठीही प्रेरणादायी आहे.

आई-वडिलांच्या सहस्रदर्शन सोहळ्याचे औचित्य साधून समाजोपयोगी कार्य करण्याची नेटके बंधूंची ही संकल्पना उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरली असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयीची प्रेरणा वाढण्यास निश्चितच मदत होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावरून संत वामनभाऊ महाराज पालखीचे आ.सुरेश धस यांच्या उपस्थितीत भक्तिमय प्रस्थान

## आ.सुरेश धस यांनी पायी चालत विविध दिंडींचे केले स्वागत

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावरून सोमवारी (दि. १३ जुलै) संत श्री वामनभाऊ महाराज यांच्या पारंपरिक पालखी-दिंडी सोहळ्याचे पंढरपूरकडे अत्यंत भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. ज्ञानोबा-तुकाराम, पांडुरंग हरी आणि विठ्ठल-रुक्मिणी च्या अखंड नामघोषाने संपूर्ण गड परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

प्रस्थानापूर्वी संत वामनभाऊ महाराजांच्या पावन पादुकांचे विधिवत पूजन, दुग्धाभिषेक, हरिपाठ, भजन, कीर्तन आणि महाआरती यांसह विविध धार्मिक विधी संपन्न झाले. भगव्या पताका, टाळ-मृदंगाचा गजर आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात हजारो वारकरी पंढरीच्या दिशेने मार्गस्थ झाले.

यावेळी आष्टी-पाटोदा-शिरूर (कासार) मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांनी संत वामनभाऊ महाराजांच्या पादुकांचे पूजन करून समाधीचे दर्शन घेतले. त्यांनी वारकरी बांधवांशी संवाद साधत त्यांच्या सुखरूप, मंगलमय आणि



भक्तिरसपूर्ण वारीसाठी शुभेच्छा दिल्या.

गहिनीनाथ गडावरील पालखी प्रस्थानानंतर आ. धस यांनी स्वतः पायी चालत विविध दिंडींमध्ये सहभागी होत वारकरी बांधवांचे स्वागत केले. मांजरसुंबा येथे श्री क्षेत्र मुक्ताईनगर (जि. जळगाव) येथून पंढरपूरकडे निघालेल्या सुमारे ८०० वर्षांची परंपरा लाभलेल्या श्री संत मुक्ताबाई पालखी रथ पायी दिंडी सोहळ्यास त्यांनी भेट दिली. यावेळी ह.भ.प. रवींद्र महाराज हरणे, ह.भ.प. पंकज महाराज पाटील आणि ह.भ.प. विशाल महाराज खोले यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी मार्गस्थ झाली होती. धनंजय देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर पाटोदा शहरात श्री संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमी असलेल्या श्रीक्षेत्र आपेगाव (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) येथून पंढरपूरकडे निघालेल्या सुमारे ८५० वर्षांची परंपरा लाभलेल्या पालखी-दिंडी सोहळ्यालाही आमदार धस यांनी भेट देऊन वारकरी बांधवांचे स्वागत केले. यावेळी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर यांच्या नेतृत्वाखाली दिंडी मार्गस्थ झाली होती. पाटोदा शहरातील नगराध्यक्ष, माजी नगराध्यक्ष, नगरसेवक, पदाधिकारी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी प्रस्थान सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले. भक्ती, शिस्त, समता, सेवा, प्रेम, आपुलकी आणि बंधुभावाचा संदेश देणारा हा सोहळा उपस्थित भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला. यावेळी स्थानिक ग्रामस्थ, विविध गावांतील भक्तगण, वारकरी बांधव तसेच अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महेश आयुर्वेद कॉलेजतर्फे वारकरी सेवा अभियान २०२६ अंतर्गत पाटोदा येथे चरणसेवा उपक्रम उत्साहात संपन्न



## या उपक्रमाचे उद्घाटन चेअरमन तथा युवा नेते मा.डॉ.अजयदादा धोंडे यांच्या शुभहस्ते संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) वारकरी संप्रदायाची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा या पवित्र भावनेतून शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी संचलित महेश आयुर्वेद कॉलेज अँड हॉस्पिटल, आष्टी यांच्या वतीने श्रीक्षेत्र पैठण येथील श्री संत एकनाथ महाराज यांच्या पंढरपूर पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकरी, टाळकरी व भाविक भक्तांसाठी वारकरी सेवा अभियान २०२६ अंतर्गत चरणसेवा हा विशेष सेवाभावी उपक्रम पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड येथे मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात आयोजित करण्यात आला.या उपक्रमाचे उद्घाटन महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा युवा नेते मा. डॉ. अजयदादा धोंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायाच्या सेवेला समाजसेवेचे स्वरूप प्राप्त झाले असून, वारकऱ्यांची सेवा करणे म्हणजे प्रत्यक्ष विठ्ठलाची सेवा करण्यासारखे पुण्याचे कार्य असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.कार्यक्रमास ह.भ.प. रंधवे बापू महाराज, आप्पासाहेब राख, पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, नगरसेवक संतोषदादा जाधव, अनिल जायभाये, ड. सय्यद अश्रफ, शाम हुले, मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख कागदे साहेब, ग्रामीण रुग्णालयाचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कासट, डॉ. दराडे मॅडम, डिगंबर नाईकनवरे, ड. गणेश परशुराम राख, प्राचार्य डॉ. गोसावी, पत्रकार बांधव तसेच महेश आयुर्वेद कॉलेज अँड हॉस्पिटलचे सर्व कर्मचारीवृंद आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.चरणसेवा उपक्रमांतर्गत पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकरी, टाळकरी व भाविक भक्तांच्या पायांची स्वच्छता करून त्यांना आराम मिळावा, त्यांच्या प्रवासातील थकवा दूर व्हावा आणि सेवाभावातून अध्यात्मिक समाधान लाभावे या उद्देशाने सेवा देण्यात आली. या सेवेमुळे वारकऱ्यांनी समाधान व्यक्त करत महेश आयुर्वेद कॉलेजच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी संचलित महेश आयुर्वेद कॉलेज अँड हॉस्पिटल हे संस्थान आरोग्य सेवा, समाजोपयोगी उपक्रम आणि जनजागृतीच्या माध्यमातून सातत्याने समाजाशी बांधिलकी जपत असून, वारकरी सेवा अभियान २०२६ अंतर्गत आयोजित करण्यात आलेला चरणसेवा उपक्रम हा सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मूल्यांचा संगम ठरला. उपस्थित मान्यवरांनी अशा सेवाभावी उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करत संस्थेच्या कार्याचे अभिनंदन केले.




# राजुरचाच हक्क अप्पर तहसील मुख्यालयासाठीच्या लढ्याला मोठे यश

## आमदारांच्या मध्यस्थीने उपोषण स्थगित महसूल मंत्र्यांचे लेखी आश्वासन- खा.डॉ. कल्याणराव काळेंचा जाहीर पाठिंबा

भोकरदन इसरारखान पठाण :-

श्रीक्षेत्र राजुर गणपती येथेच अप्पर तहसील कार्यालयाचे मुख्यालय व्हावे या एकमुखी मागणीसाठी राजुर गणपती तालुका कृती समिती,व्यापारी, सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिकांनी छेडलेल्या अन्नत्याग अमरण उपोषणाला अखेर मोठे यश मिळाले.आमदार संतोष पाटील दानवे आणि आमदार नारायण कुचे यांच्या मध्यस्थीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दूरध्वनीद्वारे सकारात्मक भूमिका घेत शासनाकडून लेखी आश्वासन दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी उपोषण मागे घेण्यात आले.

दरम्यान आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी जालना जिल्ह्याचे खासदार कल्याणराव वैजिनाथराव काळे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. राजुर गणपती ही मध्यवर्ती बाजारपेठ असून नागरिकांच्या सोयीसाठी अप्पर तहसील मुख्यालय येथेच व्हायला हवे अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली.

राज्य शासनाने नवीन अप्पर तहसील कार्यालयाचे मुख्यालय भोकरदन येथे करण्याचा प्रस्ताव जाहीर केल्यानंतर राजुर परिसरात तीव्र नाराजी पसरली होती. त्यानंतर राजुर गणपती तालुका कृती समितीच्या नेतृत्वाखाली सोमवारपासून अन्नत्याग अमरण उपोषण सुरू करण्यात आले.

उपोषणकर्ते विनोद विष्णू पुंगळे,




कैलास काशीनाथ पुंगळे आणि अरविंद थोटे यांनी यापूर्वी जिल्हाधिकारी जालना व उपविभागीय अधिकारी भोकरदन यांना दिलेल्या निवेदनात गेल्या १३ वर्षांपासून राजुर येथे तहसील कार्यालयासाठी सातत्याने आंदोलने,धरणे,निवेदने व जनजागृती सुरू असल्याचे नमूद केले होते.राजुर ही मोठी बाजारपेठ,धार्मिक क्षेत्र आणि दळणवळणाच्या दृष्टीने मध्यवर्ती असल्याने अप्पर तहसील मुख्यालय याच ठिकाणी करावे अशी त्यांची ठाम मागणी होती.

उपोषणाच्या पहिल्या दिवशी प्रशासनाकडून चर्चा करण्यात आली.मात्र समाधानकारक निर्णय न झाल्याने आंदोलन सुरूच ठेवण्यात आले. दुसऱ्या दिवशी आमदार संतोष पाटील दानवे व आमदार नारायण कुचे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी थेट दूरध्वनीवरून संवाद घडवून आणण्यात आला.

महसूल मंत्र्यांनी राजुर परिसरातील नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन संबंधित प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून तातडीने शासनाकडे पाठविण्याचे निर्देश दिले. तसेच या विषयावर सकारात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाचे लेखी आश्वासन देण्यात आले.

लेखी आश्वासन प्राप्त झाल्यानंतर उपोषणकर्ते कैलास पुंगळे, विनोद पुंगळे,अरविंद थोटे यांनी सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उपोषण स्थगित केले. संवादाच्या माध्यमातून आंदोलनाला यश मिळाल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी उपोषणकर्त्यांनी स्पष्ट केले की राजुर व पंचक्रोशीतील हजारो नागरिकांना महसूल विभागाच्या कामांसाठी दूरचा प्रवास करावा लागतो. त्यामुळे अप्पर तहसील मुख्यालयाची स्थापना राजुर गणपती येथे झाल्यास प्रशासन अधिक लोकाभिमुख व नागरिकाभिमुख होईल.शासनाच्या लेखी आश्वासनावर आमचा विश्वास असून अंतिम निर्णय राजुरच्या बाजूनेच होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राजुर गणपती परिसरात या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून नागरिकांनी आंदोलनाच्या एकजुटीला ऐतिहासिक यशाची पहिली पायरी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.उपोषणस्थळी उपस्थित मान्यवर

अण्णाराव भालेराव, त्र्यंबक आप्पा पाबळे, सरपंच भाऊसाहेब भुजंग, माजी जिल्हा परिषद सदस्य कैलासराव पाटील पुंगळे, उमेश पुंगळे, भगवान ठोंबरे, बाबुराव मामा खरात, बनकर, राहुल देशमुख, राम पाटील, कारभारी टेबले, अंगत सहाणे, उपविभागीय दंडाधिकारी श्रीमती पगारे, संबंधित विभागांचे अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



## स्मशानभूमीवरून वाद पेटला अंत्ययात्रा अडवून

# जातीय शिवीगाळ जीवे मारण्याच्या धमक्या कारवाईसाठी प्रशासनाला साकडे

बौद्ध समाजाच्या पारंपरिक स्मशानभूमीवरील अतिक्रमणाचा आरोप जिल्हाधिकाऱ्यांसह पोलिस अधीक्षकांकडे तक्रार आंदोलनाचा इशारा

जालना शेख फारुक :-

बदनापूर तालुक्यातील टोकसाळ गावात बौद्ध समाजाच्या पारंपरिक स्मशानभूमीवरून गंभीर वाद निर्माण झाला असून अंत्ययात्रा अडवून जातीय शिवीगाळ मारहाणीचा प्रयत्न व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप करत पवन श्रीरंग मांडळे यांनी जिल्हाधिकारी जिल्हा पोलिस अधीक्षक ,उपविभागीय अधिकारी,उपविभागीय पोलिस अधिकारी,तहसीलदार आणि पोलिस निरीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार दि.६ जुलै २०२६ रोजी अर्जदाराचे वडील श्रीरंग भागुजी मांडळे यांचे निधन झाल्यानंतर त्यांची अंत्ययात्रा समाजाच्या पिढीजात स्मशानभूमीकडे जात असताना काही व्यक्तींनी अंत्ययात्रा अडवून अंत्यसंस्कार करण्यास विरोध केला.यावेळी जातीय शिवीगाळ करत समाजबांधवांचा अपमान करण्यात आला तसेच मारहाणीचाही प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की यापूर्वीही संबंधितांकडून स्मशानभूमीवर अतिक्रमण करून तेथे पिठाची गिरणी व किराणा दुकान उभारण्यात आले असून शासनाने गट क्रमांक ६२ मधील सुमारे ९० गुंठे जमीन बौद्ध समाजासाठी स्मशानभूमी म्हणून आरक्षित ठेवली असतानाही त्यावर अतिक्रमण झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

अर्जदाराने असेही म्हटले आहे की, वडिलांच्या अंत्यसंस्कारानंतर पोलिसांत तक्रार केल्यास जिवंत कापून टाकू कुटुंब उद्ध्वस्त करू अशा धमक्या देण्यात आल्या.त्यामुळे समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधितांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करून तातडीने अटक करावी स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करून समाजाच्या ताब्यात द्यावी आणि कायमस्वरूपी संरक्षण द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास सर्व समाजबांधवांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही अर्जदाराने दिला आहे.



# एसटीच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त अंबड आगारात वृक्षारोपण उत्साहात

अंबड प्रतिनिधी :-

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त मंगळवार दि.१४ जुलै रोजी अंबड आगारात वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध मान्यवरांनी सहभाग नोंदवत वृक्ष लागवड केली.

यावेळी अंबड नगर परिषदेचे नगराध्यक्ष केदार दादा कुलकर्णी,अभियंता बेडवाल, अंबड आगार प्रमुख विश्वजित तेली, ईलग,कावळे महाराज, देवानंद चित्राळ,प्रशांत नाईक, असलम शेख,जे.एन.जाधव, पी.जी.चव्हाण तसेच अंबड आगारातील एसटी महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्ष लागवडीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. एसटीच्या वर्धापनदिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करून पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

## जालन्यात मैदाने वाचवा खेळाडूंच्या भविष्याशी खेळू नका

# स्व.कल्याणराव घोगरे मैदानावर व्यापारी संकुलाच्या प्रस्तावाला नगरसेवक अश्विन अंबेकर यांचा कडाडून विरोध

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक अंबेकर आक्रमक विविध प्रलंबित प्रश्नांवरही प्रशासनाला धारेवर धरले

जालना शेख फारुक :-

सुमारे पाच लाख लोकसंख्या असलेल्या जालना शहरात आज अवघी दोन मैदाने शिल्लक आहेत.आधीच आझाद मैदानावर व्यापारी संकुल उभारून त्याचे अस्तित्व धोक्यात आणले गेले.आता पुन्हा स्व. कल्याणराव घोगरे क्रीडा संकुलाच्या जागेवर व्यापारी संकुलाचा डोळा कशासाठी खेळाची मैदाने ही शहराचे फुफ्फुसे असतात ती नष्ट करू नका अन्यथा जालन्यातील तरुणाई रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही अशा अत्यंत आक्रमक शब्दांत नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी महानगरपालिकेच्या मंगळवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी आणि प्रशासनाला धारेवर धरले.

विषयपत्रिकेवरील स्व. कल्याणराव घोगरे क्रीडा संकुलाच्या जागेवर व्यापारी संकुल उभारण्याच्या प्रस्तावाला अंबेकर यांनी सभागृहात तीव्र विरोध दर्शवत हा प्रस्ताव हाणून पाडण्याची मागणी केली.

मुलांनी खेळायचे कुठे पोलीस भरतीचे



तरुण रस्त्यावर धावतात अश्विन अंबेकर यांनी सभेत जालन्यातील क्रीडा सुविधांच्या दुरवस्थेचा पाढाच वाचला.ते म्हणाले की जुन्या जालन्यातील स्व. कल्याणराव घोगरे मैदान हे आधीच लहान आहे. याच मैदानावर शहरातील सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा आणि राजकीय सभा होतात. जर येथेही सिमेंटचे जंगल व्यापारी संकुल उभे केले, तर परिसरातील लहान मुलांनी खेळायचे कुठे? आज जालन्यातील शेकडो तरुण पोलीस आणि लष्कर भरतीची तयारी करत आहेत. शहरात पुरेशी मैदाने नसल्यामुळे या गरिबांच्या मुलांना जीव मुठीत धरून डांबरी रस्त्यावर धावण्याचा सराव करावा लागतोय. जर उद्या या खेळाडूंचा अपघात झाला तर त्याची जबाबदारी प्रशासन घेणार का? असा संतप्त सवाल अंबेकर यांनी उपस्थित केला.

२५ एकरच्या आरक्षित जागेवर भव्य उद्यान' उभारा

शहरातील नागरिकांना आणि खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळण्यासाठी अंबेकर यांनी एक ठोस पर्याय प्रशासनासमोर ठेवला. नवीन जालन्यातील एसआरपीएफ च्या जागेवरील मनपाच्या उद्यान आरक्षणाची सुमारे २५ एकर जागा शासनाकडून तातडीने हस्तांतरित करून घेण्याची मागणी त्यांनी केली.२० एकर भव्य आणि निसर्गरम्य उद्यान.०५ एकर: सुसज्ज क्रीडा मैदान,अत्याधुनिक नाट्यगृह, भव्य सभागृह, ऑलिम्पिक दर्जाचा जलतरण तलाव आणि जॉगिंग ट्रॅक.

या अत्याधुनिक सुविधा निर्माण केल्यास शहराच्या वैभवात भर पडेल असे त्यांनी सुचविले. महापौर हे संपूर्ण शहराचे पालक निधी वाटपात दुजाभाव का?

सभागृहात महापौरांना थेट उद्देशून बोलताना अंबेकर यांनी निधी वाटपातील पक्षपातीपणावर जोरदार प्रहार केला.महापौर हे केवळ एका पक्षाचे नसून संपूर्ण शहराचे पालक असतात. विरोधी पक्षाचा नगरसेवक आहे म्हणून त्याच्या प्रभागाला कमी निधी देणे म्हणजे तेथील करदात्या जनतेवर अन्याय करणे आहे. नागरिक पक्ष बघून मनपाचा कर भरत नाहीत ते विकासकामांसाठी कर भरतात. त्यामुळे निधीचे वाटप समान आणि न्याय्य पद्धतीने झालेच पाहिजे या महत्त्वाच्या प्रश्नांवरही वेधले लक्ष अश्विन अंबेकर यांनी केवळ मैदानांचाच प्रश्न लावून धरला नाही तर जालन्यातील इतर ज्वलंत नागरी समस्यांवरही प्रशासनाला कोंडीत पकडले

१० दिवसांआड पाणी पुरवठा पाच लाख लोकसंख्येच्या शहराला १०-१० दिवस पाणी मिळत नसेल तर ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. पाणी पुरवठा सुरळीत करा.

स्मशानभूमीचा प्रश्न चंदनझीरा, नूतन वसाहत आणि कन्हैयानगर परिसरातील नागरिकांसाठी तातडीने स्मशानभूमी उभारण्यात यावी.

भटक्या प्राण्यांचा सुळसुळाट शहरातील मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करून नागरिकांना भयमुक्त करावे.

एकंदरीत मंगळवारी झालेल्या मनपाच्या या सभेत नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी सत्ताधाऱ्यांच्या मनमानी कारभाराचे वाभाडे काढत जनसामान्यांच्या आणि खेळाडूंच्या हक्कासाठी दिलेला हा लढा शहरात चांगलाच चर्चेचा विषय ठरला आहे.

# एस.आय.आर.च्या जाचात शिक्षकांची होरपळ मतदार पडताळणीच्या नावाखाली शिक्षकांना वेठीस

## दिवसभर घरभेटी रात्रभर ऑनलाइन अपलोड वरिष्ठांचा दबाव सहाय्यक कर्मचाऱ्यांची निष्क्रियता शिक्षकांमध्ये संताप तीन महिन्यांची मुदत व विमा संरक्षणाची मागणी

शेख फारुक विशेष वृत्त :-

राज्यात सुरू असलेल्या विशेष मतदार यादी पडताळणी एस.आय.आर. मोहिमेमुळे बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षक अक्षरश होरपळून निघत असल्याचे वास्तव समोर आले आहे. अवघ्या एका महिन्यात घराघरांत जाऊन मतदारांची पडताळणी कागदपत्रे गोळा करणे फॉर्म तपासणे आणि रात्री उशिरापर्यंत ऑनलाइन माहिती अपलोड करण्याच्या जबाबदाऱ्या शिक्षकांवर टाकण्यात आल्याने त्यांचे शैक्षणिक कौटुंबिक आणि वैयक्तिक आयुष्य विस्कळीत झाले आहे.

निवडणूक आयोगाने १ जुलै ते २९ जुलै या कालावधीत ही मोहीम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. मात्र प्रत्यक्षात गावोगावी जाऊन प्रत्येक मतदाराशी संपर्क साधणे आवश्यक कागदपत्रे मिळविणे, लोकांना प्रक्रियेची माहिती देणे आणि त्यानंतर ऑनलाइन नोंदी पूर्ण करणे हे एका महिन्यात अशक्यप्राय असल्याची भावना शिक्षक व्यक्त करत आहेत.

सहाय्यक कर्मचारी कागदावरच संपूर्ण भार शिक्षकांवर

या मोहिमेसाठी तलाठी ग्रामसेवक, कृषी सहाय्यक




यांसारख्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असली तरी अनेक ठिकाणी ते प्रत्यक्ष कामात सहभागी होत नसल्याची तक्रार आहे. परिणामी सर्व जबाबदारी शिक्षकांवरच येऊन पडत असून, चूक झाली तर कारवाईच्या धमक्या मात्र शिक्षकांनाच दिल्या जात असल्याचा आरोप केला जात आहे.दिवसभर गावात रात्रभर संगणकासमोर

शिक्षकांना सकाळपासून संध्याकाळपर्यंत घरभेटी देत मतदारांचा शोध घ्यावा लागतो. अनेक मतदार शेतात कामावर किंवा गावाबाहेर असल्याने वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. दिवसभराची धावपळ संपल्यानंतर रात्री उशिरापर्यंत फॉर्म ऑनलाइन अपलोड करण्यासाठी बसावे लागते. मात्र वेबसाइट व पमधील तांत्रिक अडचणी सर्व्हर डाऊन आणि अपलोड प्रक्रियेतील त्रुटींमुळे शिक्षकांची दमछाक होत आहे.

आरोग्यावर गंभीर परिणाम

या सततच्या ताणामुळे अनेक शिक्षक मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या खचत आहेत. रक्तदाब, मधुमेह, मानसिक तणाव आणि हृदयविकाराचा धोका वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. संभाजीनगर येथे या कामाच्या ताणामुळे एका शिक्षकाला हृदयविकाराचा झटका आल्याची घटना व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे.जनजागृतीचा अभाव शिक्षकांनाच समजावण्याची जबाबदारी

मतदारांना फॉर्म कसा भरायचा कोणती कागदपत्रे द्यायची फोटो कसा जोडायचा याची पुरेशी माहिती नसल्याने शिक्षकांनाच प्रत्येकाला समजावून सांगावे लागत आहे. अनेक जण वेळेवर कागदपत्रे देत नाहीत तर काही जण फॉर्म भरायलाही तयार नसतात. त्यामुळे शिक्षकांचा वेळ आणि श्रम दुपटीने वाढत आहेत.काही ठिकाणी अपमानास्पद वागणूक

घरभेटीदरम्यान काही शिक्षकांना शिवीगाळ अपमानास्पद भाषा आणि असहकार्याचाही सामना करावा लागत असल्याच्या घटना समोर येत आहेत. निवडणूक प्रक्रियेसाठी काम करणाऱ्या शिक्षकांना आवश्यक सुरक्षा व सन्मान मिळत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शिक्षकांच्या प्रमुख मागण्या

एस.आय.आर. मोहिमेस किमान तीन महिन्यांची मुदत द्यावी.बीएलओ म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांची नियमित आरोग्य तपासणी करावी.

निवडणूक कामादरम्यान मृत्यू अपघात किंवा गंभीर आजार झाल्यास विमा संरक्षण व भरपाई द्यावी.

सहाय्यक कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांची उत्तरदायित्वाने कामगिरी तपासावी.

तांत्रिक अडचणी दूर करून प्रभावी मार्गदर्शन व्यवस्था उभारावी.

मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवावी.

लोकशाहीसाठी मतदार यादी अचूक असणे आवश्यक आहे; मात्र त्यासाठी शिक्षकांचे आरोग्य, सन्मान आणि आयुष्य धोक्यात घालणे योग्य नाही. शिक्षक हा केवळ प्रशासनाचा कर्मचारी नसून समाजाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे एस.आय.आर. मोहिमेतील शिक्षकांच्या होरपळीची राज्य शासनाने आणि निवडणूक विभागाने तातडीने गंभीर दखल घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

# जालना कृषी अधिकारी दौऱ्यावर शेतकरी वाऱ्यावर बियाणे उगवणशक्तीच्या तक्रारींना कोण देणार न्याय

## पेरणीच्या हंगामात हजारो शेतकरी चिंतेत निकृष्ट बियाण्यांच्या तक्रारी प्रलंबित कार्यालयीन कामकाजावर परिणाम झाल्याची चर्चा

जालना शेख फारुक :-

सध्या जिल्ह्यात खरीप हंगामातील पेरणीची लगबग अंतिम टप्प्यात आली आहे. मात्र याच अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या कालावधीत जिल्ह्यातील बियाणांच्या निकृष्ट दर्जाबाबत आणि बियाणे न उगवल्याबाबत शेतकऱ्यांमधून संतापजनक तक्रारी समोर येत आहेत.अशा गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना धीर देऊन तत्काळ पंचनामे करणे व कंपन्यांवर कारवाई करणे गरजेचे असताना, जालना जिल्हा कृषी विकास अधिकारी पी. बी. बनसोडे हे मात्र मुख्यालयात ठाण मांडण्याऐवजी सतत दौऱ्यांवर असल्याने जिल्हा कृषी कार्यालय पूर्णपणे वाऱ्यावर पडले आहे.ऐन पेरणीच्या दिवसांत जिल्ह्यातील बियाणे तक्रारींचे निवारण सोडून अधिकारी महोदय खत-औषधांच्या दुकानांची तपासणी करण्यात मग्न असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.

अभ्यागतांचा खोळंबा शेतकरी न्यायासाठी भटकतोय

जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयात दररोज शेकडो शेतकरी आणि अभ्यागत आपल्या विविध तक्रारी व कामांसाठी येत आहेत. मात्र प्रमुख अधिकारीच जागेवर नसल्याने या सर्वसामान्य नागरिकांचा मोठा खोळंबा होत आहे. बियाणे उगवले नसल्याने दुबार पेरणीचे संकट ओढवलेले शेतकरी डोळ्यात अश्रू घेऊन जिल्हा कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत पण तेथे त्यांना दाद देणारे कोणीही नाही. साहेब दौऱ्यावर आहेत एवढेच ठराविक उत्तर देऊन शेतकऱ्यांना माघारी पाठवले जात आहे.हजारो तक्रारींचा ढीग केवळ ६१ तक्रारींचा कागदी खेळ? मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात बियाणे उगवणशक्तीबाबत हजारो शेतकऱ्यांनी ओरड केली आहे. प्रत्यक्षात शेतात बियाणे सडले असून शेतकरी देशोधडीला लागला आहे. मात्र कृषी विभागाच्या दफ्तरी केवळ ६१ तक्रारी प्रलंबित असल्याचा अत्यंत संथ आणि संशयास्पद कारभार समोर येत आहे. जर हजारो शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल, तर केवळ ६१ तक्रारीच प्रलंबित कशा? की आलेल्या तक्रारी दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे? असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारत आहेत.दौऱ्यांचा अतिरेक जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना कार्यालयात बसून तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यापेक्षा फिल्डवर जाऊन खत-औषधांच्या दुकानांची तपासणी करण्यात अधिक रस का असा प्रश्न उपस्थित होत आहे.कंपन्यांना अभय? बोगस व निकृष्ट दर्जाचे बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर तातडीने गुन्हे दाखल करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याऐवजी कृषी विभाग सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचा संशय बळावला आहे.पंचनाम्यांचा पत्ता नाही नुकसानग्रस्त शेतांचे तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देणे हे कृषी विभागाचे कर्तव्य आहे परंतु या महत्त्वाच्या कामाला हरताळ फासला जात आहे.

शेतकऱ्यांची मागणी जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी कृषी अधिकाऱ्यांनी आता एसी गाड्यांमधून फिरणे थांबवून आणि दुकानदारांच्या भेटी घेण्यापेक्षा जिल्हा मुख्यालयात उपस्थित राहावे. शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करून बोगस बियाणे कंपन्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अन्यथा जिल्हा कृषी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा कृषी क्षेत्रातील जाणकार आणि संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे. आता जिल्हाधिकारी या बेजबाबदार कारभारावर काय कारवाई करतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात छायाचित्रकार विजय होकर्णे निर्मित

# ‘गोदाकाठचा महान कर्मयोगी’ माहितीपटाचे प्रदर्शन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, भारताचे माजी गृहमंत्री, मराठवाड्याचे भाग्यविधाते आणि महाराष्ट्रात जलक्रांती घडवून कृषी विकासाला नवी दिशा देणारे डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त छायाचित्रकार विजय होकर्णे निर्मित ‘गोदाकाठचा महान कर्मयोगी’ या माहितीपटाचे प्रदर्शन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये दि: १४ जुलै, २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, ‘मराठवाडा : आज, काल आणि उद्या’ या विषयावरील व्याख्यानासाठी उपस्थित असलेले ज्येष्ठ विचारवंत माधव भंडारी, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा व्यवस्थापण परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण, डॉ प्रशांत पेशकार, नारायण



चौधरी जनसंपर्क अधिकारी अशोक कदम, डॉ. दिलीप चव्हाण तसेच विद्यापीठातील विभागप्रमुख, अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा, जलसिंचन क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानाचा, कृषी विकासासाठी केलेल्या कार्याचा आणि मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासातील त्यांच्या ऐतिहासिक भूमिकेचा प्रभावी वेध या माहितीपटातून घेण्यात आला. छायाचित्रकार विजय होकर्णे यांनी अनेक वर्षांच्या अभ्यासपूर्ण संशोधनातून आणि अथक परिश्रमातून साकारलेल्या या माहितीपटाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत कौतुक केले.

प्रदर्शनानंतर विजय होकर्णे यांनी माहितीपटाच्या निर्मितीमागील प्रेरणा, संशोधन प्रक्रिया आणि डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जीवनकार्याचे दस्तऐवजीकरण करताना आलेले अनुभव उपस्थितांसमोर मांडले.

यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि ज्येष्ठ व्याख्याते माधव भंडारी यांच्या हस्ते छायाचित्रकार विजय होकर्णे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी या माहितीपटाला डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रेरणादायी कार्याला उजाळा देणारा आणि भावी पिढीसाठी मार्गदर्शक ठरणारा ऐतिहासिक दस्तऐवज असल्याचे गौरवोद्गार काढले.

# पंढरपूर आषाढी वारीसाठी बाभुळगाव येथुन अनेक वारकरी सेवेसाठी रवाना

नवीन नांदेड - पंढरपूर आषाढी वारी साठी नांदेड तालुक्यातील बाभुळगाव येथुन शंभर वारकरी सेवेसाठी रवाना झाले असून काळज ता.फलटण जिल्हा सातारा येथे दिंडीतील वारीसाठी पदयात्राव्दारे येणाऱ्या भाविकांसाठी ते अन्नदान छत्र उभारून तिन दिवस अन्नदान सेवा करणार आहेत.

दरवर्षी प्रमाणे याही पाचव्या वर्षी बाबाराव मस्के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बाभुळगाव येथुन अनेक वारकरी १४ जुलै रोजी सकाळी ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून खाजगी बसने रवाना झाले आहेत.यात आनंद पाटील म्हस्के,तुकाराम म्हस्के,संतोष मस्के,बाबु मस्के,नरबा मोरे ,माधव मस्के,माधव मोरे,काळबा मस्के,नागोराव मोरे, जगन्नाथ बोडके यांच्या सह शंभर वारकरी सेवेसाठी रवाना झाले या वेळी गावकऱ्यांनी स्वागत



करून शुभेच्छा दिल्या.

१४ जुलै रोजी निघालेली खाजगी बस वारकरी तुळजापूर,पंढरपूर दर्शन करून काळज ता.फलटण जिल्हा सातारा येथे बाभुळगावकर यांच्या वतीने अन्नदान छत्र उभारून अन्नदान सेवेसाठी ते रवाना झाले आहेत.भक्ती भय वातावरण मध्ये रामकृष्ण हरी, विठ्ठल नामाचा जयघोष करीत गावकऱ्यांनी निरोप दिला.

# जिल्हाधिकारी कार्यालयात महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी मदत कक्ष

नांदेड जिल्हा प्रतिनिधी राज्य विधीमंडळाने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक नुकतेच मंजूर केले आहे. ज्याद्वारे महिला शेतक-यांचे विविध योजनांचे माध्यमातून सक्षमीकरण अभिप्रेत आहे. महिला शेतक-यांचे अनुभव लक्षात घेता आढळून येणा-या विविध अडचणी, मालकी हक्काचे दस्ताऐवज, महसूली प्रकरणे, मालमत्ता विषयक वादांची तत्परतेने दखल घेवून सुलभतेने सोडवणूक करण्याची आवश्यकता आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात महिला शेतकऱ्यांसाठी मदतकक्ष (क्शश्रि वशीज्ञ) स्थापन केला आहे.

त्याअनुषंगाने राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली रविवार १२ जुलै रोजी बैठक घेण्यात आली. महिला सक्षमीकरण अनुषंगाने महिलांच्या विविध समस्या, सुविधांची उपलब्धता, उद्भवणाऱ्या अडचणी व करावयाच्या उपाययोजना अनुषंगाने चर्चा करण्यात आली. यावेळी प्राधान्याने महिला शेतकऱ्यांचे महसूली प्रकरणे, मालमत्ता विषयक वादांची तत्परतेने दखल घेवून सुलभतेने सोडवणूक करण्यासाठी जिल्हास्तरावर मदत कक्ष (क्शश्रि विशीज्ञ) कार्यान्वित करणेबाबत त्यांनी निर्देश दिले.त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सोमवारी तत्परतेने आदेश निर्गमित करुन जिल्हाधिकारी कार्यालयात महिला शेतकऱ्यांसाठी मदतकक्ष (क्शश्रि वशीज्ञ) स्थापन केला आहे. या मदत कक्षाच्या माध्यमातून महिला शेतकरी यांचे महसूली प्रकरणे, मालमत्ताविषयक वाद इत्यादी अनुषंगाने तक्रारींची दखल घेणे, त्यांची तत्परतेने व विहित पध्दतीने सोडवणूक करण्यासाठी संबंधीत विभाग, आस्थापना, कार्यालय यांच्याशी समन्वय साधून अशी प्रकरणे विनाविलंब निकाली काढणे कामी आवश्यक पाठपुरावा करण्यात येणार आहे. महिला शेतकऱ्याच्या मदतीसाठी या मदत कक्षात एक महिला नायब तहसिलदार, विधी अधिकारी, सहायक महसूल अधिकारी व महसूल सहायकाची नियुक्ती केली आहे.

मदत कक्षात नियुक्त अधिकारी हे सदर कक्षात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून शेतकरी महिलांचे महसूली, मालमत्ताविषयक तक्रारींचे प्राधान्याने निराकरण अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करतील.

नांदेड जिल्हयातील नागरीकांनी महिला शेतक-यांचे महसूली प्रकरणे, मालमत्ताविषयक दावे, तक्रारी अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला शेतकरी मदत कक्षात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# कठोर परिश्रमातूनच यशाचा मार्ग खुला होतो - डॉ. डी. एन. मोरे

मुदखेड : पदवी शिक्षण घेत असताना नियमित महाविद्यालयात उपस्थित राहून जिद्द, शिस्त आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर विद्यार्थी निश्चितपणे यश संपादन करू शकतात, असे प्रतिपादन विचारवंत डॉ. डी. एन. मोरे यांनी केले.

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार व पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांनी सिंचन, शिक्षण आणि संरक्षण या क्षेत्रात केलेल्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच मान्यवरांच्या शुभहस्ते श्रद्धेय डॉ. शंकररावजी चव्हाण व श्रद्धेय कुसुमताई चव्हाण यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.यावेळी महाविद्यालयातील कला विज्ञान व वाणिज्य या शाखेतील विद्यापीठ परीक्षेत प्रथम येणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करून पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रमही उत्साहात पार पडला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राहुल धावारे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सतीश उमाटे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कै .डॉ.शंकरराव चव्हाण जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

मुदखेड /प्रतिनिधी

बारड कै.डॉ.शंकरराव चव्हाण जयंती निमित्त स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड संचलित, स्वातंत्र्य सेनानी राजाराम बापू माध्यमिक विद्यालय, श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड तसेच श्री शितलादेवी सेवाभावी प्रतिष्ठान संचलित शंकरराव देशमुख इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज बारडच्या वतीने आज गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ छायाबाई देशमुख (अध्यक्षा श्री शितलादेवी सेवाभावी प्रतिष्ठान बारड ) ह्या होत्या तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजय देशमुख बारडकर (अध्यक्ष:स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड), सचिव रामेश्वर गणपती कोरबनवाड सहसचिव अशोक सखाराम गव्हाणे,संचालक शेषराव दंडे, दिलीप मुलंगे, पंडित भोसले, एन.डी. देशमुख,तसेच सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक यांच्या कडून माता सरस्वती व कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सुरुवात झाली. याप्रसंगी इयत्ता नर्सरी ते बारावी पर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला इयत्ता दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा पालकासहित शाल श्रीफळ स्वामी विवेकानंद व शीतला माता यांची प्रतिमा व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.हेमंत इंगळे सर यांनी कै.डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जीवनराव प्रकाश टाकला, तर

प्रमुख पाहुणे संजय देशमुख यांनी कै *.डॉ.शंकरराव चव्हाण यांचे महाराष्ट्रासाठी असलेले योगदान आपल्याला कदापही विसरता येणार नाही असे प्रतिपादन करताना नगराध्यक्ष ते गृहमंत्री हा* प्रवास आपल्या साठी प्रेरणा देणारा असून भविष्यात तुमच्यातून परत शंकरराव जन्माला यावा म्हणून कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी करत असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप सौ छायाबाई देशमुख यांनी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचन प्रा..डॉ. पंजाब शिंदे सौ जयश्री गव्हाणे मॅडम, वर्षुल कवळे, श्रेया कदम, गौरी सावते यांनी केले

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शंकरराव देशमुख इंग्लिश स्कूल,स्वातंत्र सेनानी राजाराम बापू माध्यमिक विद्यालय व श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगदान दिले.

# एस.जी.जी.एस. इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, विष्णुपुरी, नांदेडच्या च्या वतीने मारतळा ता. लोहा जी नांदेड येथे वृक्षा रोपण कार्यक्रम

नांदेड जिल्हा प्रतिनिधी : सामाजिक बांधिलकी जोपासत एस.जी.जी.एस. इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, विष्णुपुरी, नांदेडच्या च्या वतीने दिनांक ११ जुलै रोजी मारताळा येथे संस्थेचे सचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात संस्थेच्या वतीने मारताळा येथे विविध जातीच्या झाडाची रोपे लावण्यात आली. ज्यात जांभूळ,वड,पिंपळ,कडुनिंब, इत्यादी जातीच्या रोपाची लागवड करण्यात आली. संस्थेच्या त्या निर्माण स्थळ विभागामार्फत योग्य ठिकाणाची निवड करून तेथे रोपे लावण्यात आले. संस्थेच्या वतीने यावर्षी जवळपास दोनशे २०० रोपाची लागवड केली व गावकऱ्या मार्फत जोपासना करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. कोकरे,अधिष्ठाता (नियोजन) डॉ.बीआर.बोंबडे, अधिष्ठाता (विद्यार्थी कल्याण) डॉ. माधव वैद्य,डॉ.अंकुश सावरकर स्थळ अभियंता साईनाथ ढगे , साईनाथ चिवडवार, गणेश पाटील, हरीशम उबळे, बुधराम डोंगरे ,



निवासी ग्रामस्थ व संस्थेतील अनेक कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपला सहभाग नोंदवून वृक्षारोपण केले.फ

# मराठवाड्यात विकासाची मोठी सुप्तशक्ती - ज्येष्ठ विचारवंत माधव भंडारी

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

मराठवाड्याच्या विकासास डॉ. शंकरराव चव्हाण यांनी दिलेल्या योगदानामुळे मराठवाड्याची स्थिती भीषण होण्यापासून वाचली. सिंचनाशिवाय मराठवाड्यातील शेतीच्या विकासाची शक्यता नव्हती, हे ते जाणून होते. त्यांच्या संकल्पनेतूनच जायकवाडी, विष्णुपुरी हे प्रकल्प पूर्ण झाले. मराठवाड्याकडे सुपीक जमीन, उपलब्ध जलसंपदा, कुशल मनुष्यबळ, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि पर्यटनाची मोठी क्षमता आहे. कृषी, कृषी प्रक्रिया उद्योग, आधुनिक तंत्रज्ञान आणि वारसा पर्यटन यांची प्रभावी सांगड घातल्यास मराठवाडा हा महाराष्ट्राच्या विकासाचे ’ग्रोथ इंजिन’ ठरू शकतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत तथा सिंचन प्रकल्पग्रस्त पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा) माधव भंडारी यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ’डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्रा’च्या वतीने डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ’मराठवाडा : काल, आज व उद्या’ या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्रदादा चव्हाण, डॉ. प्रशांत पेशकार आणि नारायण चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या व्याख्यानात माधव भंडारी यांनी मराठवाड्याच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहासाचा वेध घेत भविष्यातील विकासाच्या संधींवर सखोल विवेचन केले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील त्यांच्या नेतृत्वासोबतच सामाजिक समतेसाठीच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला.

माजी मुख्यमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळे जायकवाडी आणि विष्णुपुरीसारखे महत्त्वाचे सिंचन प्रकल्प साकार झाले आणि मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली, असे त्यांनी सांगितले. मराठवाड्याचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीचा असून तेर आणि भोगवर्धन ही प्राचीन व्यापारी केंद्रे ग्रीस व रोमपर्यंत व्यापार करत होती. कापूस, वस्त्रनिर्मिती, काच वस्तू, मणी, रंगद्रव्ये तसेच कृषी प्रक्रिया उत्पादनांच्या निर्यातीचे पुरातत्त्वीय पुरावे उपलब्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील बारवांसारख्या



पारंपरिक जलव्यवस्थापन पद्धतींचा उल्लेख करत त्यांनी जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित केले. यादव राजवटीत मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेच्या विकासाला मोठी चालना मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.

रोजगाराच्या शोधात मराठवाड्यातील युवक मोठ्या शहरांकडे स्थलांतर करत असले तरी आगामी दशकात सुशिक्षित युवक पुन्हा शेतीकडे वळतील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी शेतीला प्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेशी जोडण्याची गरज अधोरेखित केली. केळी, कापूस, कडधान्ये, तेलबिया यांसारख्या पिकांवर आधारित उद्योगांमधून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पर्यटन क्षेत्रातील संधींबाबत बोलताना त्यांनी रेणुकामाता, अंबाजोगाई, तुळजाभवानी, औंढा नागनाथ, देवगिरी किल्ला तसेच मराठवाड्यातील ऐतिहासिक किल्ले, मंदिरे आणि सांस्कृतिक वारसा यांचे प्रभावी संवर्धन व विपणन केल्यास हा प्रदेश देश-विदेशातील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरू शकतो, असे मत व्यक्त केले.व्याख्यानाचा समारोप करताना त्यांनी, इतिहास विसरून चालत नाही. इतिहास, जलसंपदा, शेती, तंत्रज्ञान आणि उद्योजकता यांच्या बळावर मराठवाड्याचा उज्ज्वल भविष्यकाळ घडविता येईल, असा आशावाद व्यक्त केला.

अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, जोपर्यंत मराठवाड्यात पाणी वाहत राहील, तोपर्यंत या प्रदेशाला डॉ. शंकरराव चव्हाण यांची आठवण होत राहील. विष्णुपुरी धरण आणि जायकवाडीसारखे सिंचन प्रकल्प हे त्यांच्या दूरदृष्टीचे जिवंत स्मारक असून मराठवाड्याच्या विकासाच्या वाटचालीतील मैलाचे दगड आहेत.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छायाचित्रकार विजय होकर्णे निर्मित डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जीवनकार्यावरील ‘गोदाकाठचा महान कर्मयोगी’ माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ आणि डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी प्रमुख वक्ते माधव भंडारी यांचा परिचय करून दिला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन आणि व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण यांनी डॉ. शंकरराव चव्हाण यांच्याशी संबंधित आठवणींना उजाळा देत त्यांच्या विकासदृष्टीचा गौरव केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्राचे समन्वयक प्रा. दिलीप चव्हाण यांनी केले. यावेळी विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, संशोधक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीचे अर्ज मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील पात्र विद्यार्थ्यांनी शुक्रवार २४ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी जिल्हा कार्यालयात संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर. एन. पवार यांनी केले आहे.

सन २०२६ या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, वैदकीय व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारी गुण प्राप्त झाले असतील अशा उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यास, विद्यार्थीनींना महामंडळाकडून ज्येष्ठता व जास्त गुण क्रमांकानुसार जिल्ह्यातील प्रथम ३ ते ५ विद्यार्थ्यास उपलब्ध निधीच्या अधीन राहून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यामुळे पुढीलप्रमाणे आवश्यक ती मुळ कागदपत्रे दोन प्रतीसहित आणावीत. मार्कशिट, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, जातीचा दाखला, उत्पनाचा दाखला, आधारकार्ड, दोन छायाचित्र, पुढच्या वर्गात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकिटसह व जिल्हा व्यवस्थाकांच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज इत्यादी कागदपत्रासह संपर्क साधावा. मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर. एन. पवार यांनी केले आहे.